**सबब श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्ताने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधील तांत्रिक व वित्तीय माहितीची छाननी करुन अहवाल सादर करणेसाठी Arham Constrotech Pvt. Ltd., Nashik Road यांचे दर मान्य करुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

१३ **श्री रामनवमी उत्सव २०१५ करिता उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी दरपत्रक (निविदा) मागविणेबाबत.**

सन २०१५ मध्ये संस्थान मार्फत साजरे करण्यात येणारे श्री रामनवमी ,श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी या उत्सवासाठी भक्तमंडळ सभासद, देणगीदार, ग्रामस्थ इ. देणकामी पत्रिका छपाई करणेकामी मान्यता घेणकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दि.६/११/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.९३९ "श्रींच्या तिनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका आवश्यकतेनुसार त्या त्या उत्सवाच्या वेळेस उपसमिती सभेच्या मान्यतेने छपाई करुन घेण्यात यावी असे ठरले."

सन २०१४ या वर्षातील श्री रामनवमी उत्सवासाठी निमंत्रण पत्रिका एकुण रु.२,८५,८५२/- खर्च झालेला आहे. प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी वर्षातून तीन वेळेस दरपत्रके मागविण्यात येतात. सदरचे काम दर उत्सवात करणे अत्यावश्यक असल्यामुळे रुटीन स्वरुपाचे आहे. यामध्ये फोर कलर पत्रिका छपाई करणे , पत्रिकेच्या घडया घालणे,पाकीटमध्ये भरणे, पाकीटाला चिटकवणे कामी गम टेप वापरणे, पाकीटावर पत्ते प्रिंट करणे इ.कामे प्रेसधारक यांचे कडून करुन घेता येईल. वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा, दरपत्रके मागविता येईल.

श्री रामनवमी उत्सव २०१५ च्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी विविध प्रेसधारक यांचे कडून दरपत्रके मागविणे, दरपत्रके मागविणे कामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व पत्रिका छपाई करणेकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- (रु.पाच लाख ) मात्र खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव २०१५ च्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी विविध प्रेसधारकांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी-०५)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील लिनन खरेदीकरणेकामी प्राप्त ई कमर्शियल निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.९९०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४** **सन २०१५ चे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व पुस्तके/ फोटो छपाईकामीचे ऑनलाईन दरपत्रक (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३०, २३१, २३४ व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने पी.आय.एल.नं.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्र.५८१६/ २०१४ मध्ये दि.२६.०९.२०१४ रोजी केलेला हुकूमनाम्यानुसार डायरी / कॅलेंडर्स व साठा संपत आलेले पुस्तके / फोटो छपाईकामी अंदाजे येणा-या रु.५,०४,०८०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार ऑनलाईन दरपत्रके मागविण्यात आली आहे.सदरचे ऑनलाईन तांत्रिक ( Technical Bid) निविदा दि.०८.११.२०१४ रोजी मिटिंग हॉलमध्ये उघडून प्रेसधारकांच्या समोर त्यांचे आलेले बंद पाकीटे समक्ष दाखविले असून त्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे सांगीतले आहे व तद्रंतर तांत्रिक (Technical Bid) निविदाचे पाकीटे मा.मुख्य लेखाधिेकारी यांचे समक्ष दि.११.११.२०१४ रोजी उघडण्यात येऊन त्यांनी ऑनलाईन व पाकिटातील प्राप्त झालेल्या कागदपत्रांची शहानिशा करुन खालीलप्रमाणे प्रेसधारक पात्र आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| ०१ | सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर | पात्र |
| ०२ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | पात्र |
| ०३ | सॅप प्रिंट सोल्युशन, मुंबई | पात्र |
| ०४ | चेरी ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| ०५ | निट प्रिंटर्स,अहमदनगर | पात्र |

उपरोक्त तक्त्यातील प्रेसधारकांचे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व पुस्तके/ फोटो छपाई कामीची ऑनलाईन दरपत्रके (Commercial Bid) आजचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आली. त्यांच्या मुळ दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अं. नं. | छपाई तपशिल | सॅप सोल्यु लोशन प्रा.लि. मुंबई | टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई | सकाळ पेपर प्रा. कोल्हापूर | चेरी प्रिंटींग & पॅकेजींग इंडस्टिज प्रा.लि. ऑफसेट, सोलापुर | निट प्रिंटर्स, अहमदनगर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई दैनंदिनी २०१५ १,३०,००० नग | **६६.००** | ६६.५० | **६६.००** | **६६.००** | ६८.९० |
| २ | श्री साईबाबा दिनदर्शिका (०१ पाने ) २०१५ ३,००,००० नग | १८.१८ | १७.१० | - | १६.५९ | **१५.३०** |
| ३ | श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१५ १५,००० नग | २८४.०० | **२३४.००** | २७८.०० | २८५.०० | २७३.०० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट दिनदर्शिका २०१५ ५००० नग | ३१८.०० | **२७९.००** | ३२४.०० | ३२०.०० | ३१५.०० |
| ०५ | श्री साईबाबा ३डि वॉल दिनदर्शिका २०१५ ३००० नग | **२३८.००** | ३४२.०० | ३८८.०० | ३८४.०० | ३९७.०० |
| ०६ | श्री साईबाबा ३डि डेस्क दिनदर्शिका २०१५ ५००० नग | ३८५.०० | **२०७.००** | ३२४.०० | २३६.०० | २२९.०० |
| ०७ | श्री साईचरित कन्नड ३०,००० नग | ५५.०० | - | ५७.६६ | **४८.१३.** | ५६.७० |
| ०८ | श्री साईचरित बंगाली ३००० नग | ७५.५० | - | ८६.९९ | **५७.३९** | ६६.०० |
| ०९ | श्री साईंचे सत्यचरित | १५०.०० | - | १५७.० | १२४.९९ | **११७.००** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तेलगू ७००० नग | | | | | |
| १० | श्री साईचरित सार हिंदी दोहावली ७००० नग | ९१.८२ | - | ७४.३९ | ७८.६५ | **६१.२०** |
| ११ | मुलांचे साईबाबा इंग्रजी (लेखक विकास मेहता) ५००० नग | ८०.५५ | - | ७७.५० | **६३.८६** | - |
| १२ | मुलांचे बाबा कन्नड ५००० नग | १३.७५ | - | ९.४७ | **७.९१** | - |
| १३ | मुलांचे बाबा तेलगू ५००० नग | १४.१० | - | ९.९० | **८.५१** | - |
| १४ | साई की और मेरा पहला कदम- हिंदी/ इंग्रजी १५०० नग | ११०.५० | - | **९०.३४** | १११.५० | - |
| १५ | श्री साईलिलामृत मराठी ६००० नग | ३३.७५ | - | ४१.१३ | **२६.५४** | - |
| १६ | श्री साईबाबा अवतार व कार्य – गुजराथी १००० नग | **३७.८६** | - | ४२.६५ | - | - |
| १७ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी गुजराथी ५००० नग | ५.५० | - | **४.३९** | - | ४.५० |
| १८ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी कन्नड ७००० नग | ५.०० | - | **४.००** | - | ४.५० |
| १९ | श्री साई रुद्राध्याय – मराठी १५००० नग | ४.०० | - | **३.८५** | - | ४.५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | श्री साई सगुणोपासना – मराठी १,५०,००० नग | ५.७५ | - | ५.०० | ४.८० | **<u>३.६०</u>** |
| २१ | समाधी ३डि फोटो २.५ x३.५ २५,००० नग | २५.०० | **<u>४.५०</u>** | - | - | - |
| २२ | पालखी ३डि फोटो २.५ x३.५ ५०,००० नग | २५.०० | **<u>४.२५</u>** | - | - | - |

**निर्णय क्र.९९१ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) प्रस्तावित श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका- २०१५ व पुस्तके/ फोटो छपाई करुन घेणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा.**

**(२) श्री साई दैनंदिनी- २०१५ छपाईकरिता तीन निविदाधारकांचे समान निम्नतम दर आलेले असून ते दर स्विकारणेत येऊन त्यांना समप्रमाणात विभागून छपाई आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(3) तसेच प्रस्तावित छपाईकामी रु.५,०४,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली असून प्रत्यक्षात रु.२,४३,९४,१८०/- मात्र खर्च होणार आहे. त्यामुळे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका- २०१५ ची वेळेपूर्वी विक्री झाल्यास व परत छपाई करणेची आवश्यकता वाटल्यास याच मंजुर दराने व अटी/ शर्तीनुसार वाढीव छपाई करणेत यावी. याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५ मौजे शिंगवे, ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकिचे क्षेत्रात संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद :-**

महाराष्ट्र शासनाचे अधिनियम २००४ मधील सुधारीत कलम २१(२) (दोन) नुसार "स्थानीक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- शिर्डी येथे साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात आला आहे. सदरचे

प्रकल्पास शासनाचे मान्यतेसाठी बगीचा विभागामार्फत जा.क्र.एसएसएस/बगीचा/१०७७०/२००९, दि.२६/०८/२००९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू प्रकल्प दि.२९/०७/२०१० रोजी साईटेक सायंटीफीक सिस्टीम यांचेमार्फत सदरहू प्रकल्प कार्यान्वीत करणेत आलेला होता. सदर ठिकाणी कचरा साठविणेस जागा कमी पडत असल्याने कचरा साठवणे करीता ९०० चौ.मी. क्षेत्रफळात वाढीव प्लॅटफॉर्म करणेत आलेला होता. सदरहू कामास शासनाचे मान्यतेस्तव इकडील विभागाचे जा.क्र.एसएसएसटी /बांधकाम/११७५/२०११ दि.०१/०६/२०११ रोजीचे पत्राने प्रस्ताव सादर करणेत आला आहे उपरोक्त दोन्हीही प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर विचाराधीन आहेत. सदरहू प्लांटमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम सध्या स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे बंद आहे. त्यामुळे संस्थानचा निघणारा कचरा हा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं. १८२ मध्ये खड्डे घेऊन टाकण्यात येत आहे. तसेच संस्थानचे मौजे निमगांव- को-हाळे येथील गट नं. १४९ मध्ये स्वंतत्र घनकचरा प्रकल्प राबविणे बाबत संस्थानचे आरोग्य विभागामार्फत प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणेबाबत कार्यवाही चालू आहे.

प्रस्तावः- शनिवार दिनांक १५/११/२०१४ रोजी मा.श्री. एकनाथ डौले, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी येथिल सभागृहात झालेल्या बैठकीचे वेळी घनकचरा प्रकल्पाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मा. आयुक्त यांनी अशी सूचना दिली की शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांची शिंगवे येथिल जागा संस्थानला उपलब्ध करुन दिल्यास संस्थानने त्या ठिकाणी घनकचरा प्रकल्प उभारावा. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये त्यांनी खरेदी केलेल्या मौजे शिंगवे शिवारातील १० एकर ३० गुंठे जागेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी करणेसाठी सदर क्षेत्रास वॉलकंपाऊंड करणे, रस्ते करणे, वीज कनेक्शन घेणे, पिण्याचे व प्रक्रीयेसाठी पाणी उपलब्ध करणे व इतर अनुषंगीक पायाभूत व्यवस्था करणे नगरपंचायतीस आर्थिक परिस्थितीअभवी करणे शक्य नाही. सदर ठिकाणी वरिल प्रमाणे सुविधा निर्माण केल्यास शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कच-याचा प्रश्न निकाली निघेल असे त्यांनी दि.१८/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ पोटकलम २ अन्वये शिर्डी नगरपंचायत यांचे मागणी प्रमाणे सदरहू ठिकाणी संस्थानचे निधीतून घनकचरा प्रकल्प राबविणेसाठी मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे पूर्वपरवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरगांबाद यांची देखील मान्यता घ्यावी लागेल.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची परवानगी घेणे व बांधकाम परवाना प्राप्त करणेची कार्यवाही शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत करता येईल. तसेच संस्थानचा कचरा टाकणेबाबत त्यांनी कोणत्याही प्रकारची हरकत करु नये व सदरहु प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर त्याचा दुरुस्ती देखभालीचा खर्च कोणी करावा याबाबत अटीं व शर्तीचा सविस्तर करारनामा शिर्डी नगरपंचायत व संस्थानमध्ये होणे आवश्यक आहे. या प्रस्तावाबाबत शिर्डी नगरपंचायत यांचे सभेत ठराव होणे आवश्यक आहे.

तरी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणी प्रमाणे नगरपंचायतीने खरेदी केलेल्या शिंगवे येथील स.नं. ६९/२/३ या जागेवर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व त्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा निर्माण करणेसाठी संस्थानतर्फे सल्लागार नेमणुकीसाठी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिंगवे, ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे क्षेत्रात संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी सल्लागार नेमणूकीसाठी सल्लागारांकडून प्रस्ताव (RFP) मागविणेत यावेत. तथापि त्यांना नेमणूकपत्र देण्यापुर्वी संस्थान (सिनियर कौन्सिल) वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६** **अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन शासनाचे मान्यता दिलेले विनियमांचे इंग्रजी व मराठी मसुदे प्रकाशीत करुन हरकती मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - 2004 मधील तरतुदीस अनुसरून शासन क्रमांक: सासंवि-2012/ प्र.क्र.19/ का.सोळा, पुनर्बांधणी-7/ का.सोळा, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई-32 दि.28 ऑक्टोबर, 2013 अन्वये शासनाने संस्थानचे विनियम व नियमाचे इंग्रजी मसुद्यास अंतिम मान्यता दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम - 2004 मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

2 (झ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम, असा आहे.

11 (6) समितीस, आपल्या कार्यपध्दतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्यातील नियमांशी सुसंगत होतील असे विनियम करता येतील.

25 (3) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील.

शासनाने मान्यता दिलेले नियम व विनियमांचे मसुदे प्रकाशित करणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.12/06/2014 रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

1) शासनाने मान्यता दिलेले नियम व विनियमांचे अंतिम मसुद्याप्रमाणे सन 2013-2014 पासून अंमलात आणेणे बाबतची कार्यवाही करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.
2) शासनाने मान्यता दिलेले मसुदे इंग्रजी भाषेत आहेत. त्यांचे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 दि.18/01/2008 चे शासन निर्णयान्वये इंग्रजी मजकूराचा मराठी अनुवाद करणेकामी अधिकृत व्यक्तीची नियुक्ती करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.
3) अधिकृत व्यक्तींकडून सदर मसुद्यांचे मराठीत भाषांतर केल्यानंतर सदर मसुद्यास विधी व न्याय विभागाची मान्यता घ्यावी लागेल.
4) अधिनियमातील तरतुदीनुसार मराठी अनुवादास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळालेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार शासकीय मुद्रणालयातून अंतिम इंग्रजी व मराठी मसुदे छपाई करुन ते प्रकाशीत करणेबाबतची कार्यवाही करता येईल. तसेच मराठी अनुवाद करणेकामी व अंतिम मसुदे शासकीय मुद्रणालयातून छपाई करणेकामी येणाऱ्या खर्चाबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

त्यावर मा.व्यवस्थापन समिती दि.12/06/2014 चे सभेत निर्णय क्र.492 खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे :-

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली असून ते मसुदे इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे इंग्रजी मजकूराचा मराठी अनुवाद करणेकामी उचित मानधनावर अधिकृत व्यक्तीची नियुक्ती करणेत यावी व त्यांचेकडून मराठीमध्ये भाषांतर करुन घेतलेनंतर सदर मसुदे सभेच्या मान्यतेसाठी सादर करावेत. तोपर्यंत यापुर्वीचेच नियम कायम ठेवणेत यावे."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेकामी दि.18 जानेवारी 2008 रोजी शासनाने निश्चित केलेल्या भाषा तज्ञांचे नामिकेवरील (पॅनल) भाषा तज्ञ प्रा.डॉ.दिनकर तु. खाबडे, कोल्हापूर, डॉ.भा.व्यं.गिरिधारी, पुणे व डॉ.ए.एम.कात्रे, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-01/1930/2014 दि.22/07/2014 अन्वये लेखी कळवून संबंधीतांकडून लेखी अहवाल/अभिप्राय व संमतीपत्र मागविण्यात आले होते.

त्यानुसार डॉ.ए.एम.कात्रे, पुणे यांनी सदरचे कामासाठी निम्नतम दर देऊन 60 दिवसात सदरचे काम पुर्ण करुन देण्याचे कळविल्याने त्यांना

जा.नं.एसएसएस/वशी-01/2733/2014 दि.03/09/2014 चे आदेशान्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यांनी इंग्रजी मजकुराचे मराठी अनुवाद करण्याचे काम दि.05/11/2014 रोजी पूर्ण करुन दिलेले आहे. (मराठी अनुवादाची प्रत माहितीसाठी सोबत जोडलेली आहे)

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे संस्थान अधिनियम - 2004 मध्ये 25 (3) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील, असी तरतूद आहे. परंतु, शासनाने मान्यता दिलेले इंग्रजी मसुदे हे कोणत्याही प्रकारची पुर्वप्रसिध्दी न करता, हरकती न मागविता अंतिम केलेले आहेत. तसेच मा.त्रिसदस्य समितीचे दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णयानुसार इंग्रजी भाषेतील मसुदे अधिकृत व्यक्तीकडुन मराठीत भाषांतर झाल्यानंतर सभेच्या मान्यतेसाठी सादर करावयाचे असल्यामुळे शासनाने मान्यता दिलेले इंग्रजी मसुदे व मराठीत अनुवाद केलेले मसुदे अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्वप्रसिध्द करुन हरकती मागविणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेले विनियम दि.०१.०१.२०१५ पासून संस्थानसाठी लागू करणेत यावेत. तसेच, याबाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास ते कायदेशीर हरकत नोंदवू शकतील, त्यासाठी संबंधीतांनी मागणी केल्यास त्यांना सदरहू सेवा विनियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७ श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचा नोकरी मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अ) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार, संगमनेर यांनी दि.29/10/2014 रोजीचे अर्जान्वये मला नोकरीत असलेल्या अनुभवाचा उपयोग सेवा निवृत्तीनंतर श्री साईबाबांच्या दरबारात सेवेत रुजू होणेबाबत माझा मनोदय आहे. तरी कृपया मला संस्थानमध्ये पर्यवेक्षीय दर्जाच्या पदाची नोकरी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

श्री.वालझाडे यांनी दि.29/10/2014 चे अर्जात नमुद केलेली वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे-

1) नांव :- कृष्णा विश्वनाथ वालझाडे
2) पुर्ण पत्ता :- "स्वामीनी" उल्हास कॉलनी, चैतन्यनगर, संगमनेर ता.संगमनेर, जि.अहमदनगर

3) मोबाईल नंबर :- 9096579798 दूरध्वनी : (02425) 223973
4) शिक्षण :- एम.कॉम, एम.एस.सी.आय.टी., इंग्लीश टाईपरायटींग 40 श.प्र.मि.

5) पुर्वानुभव :- महसूल खात्यातून राजपत्रीत दर्जाच्या नायब तहसिलदार पदावरुन

दि.31/8/2013 रोजी संगमनेर येथुन सेवा निवृत्त झालो असुन

प्रशासकीय कामाचा अनुभव

6) नोकरीतील विशेष गुणवत्ता :- 1) उत्कृष्ट कामाबद्दल दोन वेळा अतिरिक्त वेतनवाढ मिळालेल्या आहेत.

2) उत्कृष्ट कामाबद्दल सन 2013 मध्ये महसूल दिनात सन्मानपत्र देवून गौरविण्यात आलेले आहे.

3) सन 90-91 व 98-99 या आर्थिक वर्षात अल्पबचत या राष्ट्रीय

कार्यात उत्कृष्ट काम केल्याबद्दल प्रशस्तीपत्रक प्राप्त

4) 7 डिसेंबर 1983 या ध्वजदिना निमित्त जास्तीत जास्त निधी जमा केल्याने गौरवाप्रित्यर्थ सनद प्राप्त

ब) यापुर्वी श्री साईबाबा संस्थानच्या वाढत्या विकासाच्या दृष्टीने भूसंपादन व जमीन बाब विषयक कामे करणेकामी श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची जा.नं.एसएसएस/वशी-01/449/2000 दि.04/02/2000 चे आदेशान्वये रु. 7,000/- एकत्रित मानधनावर दि.14/12/1999 पासून कंत्राटी सल्लागार या पदावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानंतर त्यांना सदरचे पदावर वेळोवेळी मुदतवाढ देऊन एकत्रित मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. सध्या बांधकाम विभागाकडे भूसंपादन विषयक प्रस्तावावर कार्यवाही सुरु असून, काही जमीन खरेदी विषयक प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. बांधकाम विभागास भूसंपादन व जमीनी विषयक प्रस्तावामध्ये तांत्रिक बाबींमध्ये सखोल ज्ञान नसल्याने अशा प्रस्तावांचे बाबतीत कार्यवाही करणेस अडचणी येत आहेत.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.08/01/2014 नि?र्णय क्र.67 नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ 3844/ 2014 दि.24/02/2014 नुसार श्री.चंद्रकांत रणशूर यांना दि.01 मार्च 2014 पासून एक वर्ष (दि.28/02/2015 अखेर) कालावधीसाठी कंत्राटी सल्लागार म्हणून रु.15,000/- वर मुदतवाढ देण्यात आलेली असून ते दि.19/05/2014 पासून आजारी असल्याने कामावर येत नाहीत.

तसेच, संस्थान अधिनियम 2004 मधील तरतुदीस अनुसरून मा.व्यवस्थापन समिती दि.06/11/2014 निर्णय क्र.986 नुसार चल-अचल मालमत्तेचे योग्यरित्या संरक्षण करणेकामी मालमत्ता विभाग स्वतंत्र करुन एक विभाग प्रमुख, एक जमीन मोजणीदार व लिपीक वर्गीय कर्मचारी देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये सुधारणा करुन जमीन मोजणीदारासह

एक भूसंपादन विषयक कामकाजासाठी पूर्वीप्रमाणेच कंत्राटी सल्लागार (श्री.रणशूर यांचेऐवजी) नेमणेत यावा, असे मत आहे.

उपरोक्त 'ब' मधील वस्तुस्थिती विचारात घेता, संस्थानचा वाढत्या विकासानुसार चल - अचल मालमत्तेचे योग्य रित्या संरक्षण करणे आवश्यक आहे. त्याचे विहीत पध्दतीने रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. सदरचे कामासाठी सल्लागार म्हणून श्री.चंद्रकांत रणशूर यांची दि.28/02/2015 अखेर कंत्राटी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतु ते सध्या आजारी असल्याने दि.19/05/2014 पासून आज अखेर कामावर येत नाही. त्यामुळे संस्थानचे भूसंपादनाबाबतचे कामकाजात अडचणी येत आहेत.

त्यासाठी श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/3488/2014 दि.24/02/2014 अन्वये कंत्राटी सल्लागार या पदासाठी दि.28/02/2015 अखेर दिलेली मुदतवाढ संपुष्टात आणून उपरोक्त अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार यांनी दि.29/10/2014 चे अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांना महसूल खात्यातील नायब तहसीलदार या पदाचा अनुभव असल्याने त्यांची संस्थानचे भूसंपादन व मालमत्ता विषयक कामांसाठी कंत्राटी सल्लागार म्हणून एकत्रित मानधन रु. 15,000/- (अक्षरी रुपये पंधरा हजार) वर किमान एक वर्ष मुदतीसाठी नेमणूक करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर यांना कंत्राटी सल्लागार या पदासाठी दि.२८.०२.२०१५ अखेर दिलेली मुदतवाढ संपुष्टात आणणेत यावी.**

**तसेच, संस्थानचे भू-संपादन व मालमत्ता विषयक कामांमध्ये अडचणी येऊ नयेत यासाठी सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत एक कुशल कंत्राटी सल्लागार रु.१५,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन देण्यात येऊन, एक वर्ष कालावधीसाठी घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.८** **आयडीया ग्रपमोबाईलची मर्यादा वाढवुन नविन सीमकार्ड खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांना अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी आयडीया कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने सुरु केलेली असुन या सेवेअंतर्गत एकुण १०० मोबाईल सीमकार्ड आयडीया कंपनीकडुन खरेदी करण्यात आलेले असुन मंजूर पदाकरीता कार्यालयीन वापरासाठी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मंजूरीने संबधित अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आलेले आहेत.

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दिनांक ०५/०६/२०१४ चे सभेतील विषय क्र.७१ निर्णय क्र.३५९ नुसार व विद्युत विभागाचे दि.१७/०७/२०१४ चे मंजूर टिपणी अन्वये मा.अध्यक्ष साहेब व उपाध्यक्ष साहेब यांचे मोबाईलचे बीलाची सर्व रक्कम संस्थानमार्फत कंपनीस आदा करण्यात यावी, मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचेही ग्रुपमोबाईलचे संपुर्ण बील संस्थानमार्फत कंपनीस आदा करण्यात यावे.तसेच प्रशासकिय अधिकारी, अधिक्षक (विभाग प्रमुख),डॉक्टर्स,यांचे ग्रुपमोबाईलचे येणारे एकुण बीलापैकी फक्त रु.३००/- मात्र संस्थानने आदा करुन उर्वरीत बीलाची सर्व रक्कम संबधित अधिकारी व विभाग प्रमुख यांचे मासीक वेतनातून वसूली करण्यात यावी. तसेच पर्यवेक्षक यांचे रु.२५०/-पर्यंत,तांत्रिक सहायक व वरीष्ठ लिपीक यांचे रु.२००/- पर्यंत व वाहन चालक व सुरक्षा पर्यवेक्षक यांचे रु.१५०/- पर्यंतचे मोबाईल बीले ही संस्थानमार्फत कंपनीस आदा करण्यात येऊन उर्वरीत सर्व जादा बीलांची रक्कम ही संबधित अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनातून पगारबील विभागामार्फत दरमहा वसुली करण्यात यावी अशी मान्यता मिळालेली असुन त्यानुसार कार्यवाही चालु आहे. सध्या चालु असलेले १०० ग्रुपमोबाईलचे दरमहा बील २० हजारापर्यंत येत आहे.

संदर्भ क्र.१ चे पत्रानुसार वैद्यकिय संचालक यांनी श्रीसाईबाबा हॉस्पिटल मधिल (१) डॉ.प्रितम वडगांवे RMO (MCO) (२) श्री.दिलीप औदिच्य मेडीकल भांडार व माल व्यवस्थापक (३) श्री.एम.के.थोरात मेडीकल स्टोअर फार्मासिस्ट यांचेकरीता संस्थानचे आयडीया ग्रुपमोबाईल सेवेतील सीमकार्डची मागणी केलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ चे मंजुर टिपणीनुसार जनसंपर्क कार्यालयातील पास वितरक लिपीक श्री.विष्णु दगडु थोरात यांनाही संस्थानचे आयडीया ग्रुपमोबाईल सेवेतील सीमकार्ड मिळणेबाबत मंजूरी मिळालेली आहे.

संस्थानचे संपर्क व्यवस्थेसाठी असलेल्या आयडीया कंपनीच्या ग्रुपमोबाईल सेवेतील जुन्या प्लॅनमध्ये बदल करुन नविन प्लॅननुसार नविन १०० सीमकार्ड घेणेबाबत निर्णय झालेला असुन त्यानुसार १०० सीमकार्ड खरेदी करण्यात आलेले असुन ज्यापदासाठी सीमकार्ड घेण्यात आलेले आहेत त्यापदासाठी संबधित अधिकारी व कर्मचारी यांना वापरासाठी देण्यात आलेले आहेत. सध्या विद्युत विभागाकडे उपरोक्त मागणी केलेप्रमाणे पदासाठी सीमकार्ड नसल्याने उपरोक्त पदासाठीचे आवश्यकतेनुसार नविन सीमकार्ड

घ्यावे लागेल. तसेच त्याची मर्यादा पूर्वीचे १०० सीमकार्ड धरुन आणखी १०० म्हणजेच २०० इतकी ठेवावी लागेल.

म्हणजेच यापुढे ज्यांची मागणी असेल त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची मंजूरी घेऊन ती मागणी विद्युत विभागाकडे पाठविले नंतर या वाढीव घेण्यात येणा-या १०० सीमकार्ड मधुन एकदम १०० सीमकार्ड न घेता मागणीनुसार टप्प्याटप्प्याने सीमकार्ड देता येऊ शकतील.

वैद्यकिय संचालक श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांनी मागणी केले प्रमाणे (१) डॉ.प्रितम वडगांवे, RMO (MCO) (२)श्री.दिलीप औदिच्य, मेडीकल भांडार व माल व्यवस्थापक (३)श्री.एम.के.थोरात, मेडीकल स्टोअर फार्मासिस्ट यांचेकरीता संस्थानचे आयडीया ग्रुपमोबाईल सेवेतील सीमकार्ड देणेसाठी तसेच जनसंपर्क कार्यालयातील पास वितरक लिपीक श्री.विष्णु दगडु थोरात यांनाही संस्थानचे आयडीया ग्रुपमोबाईल सेवेतील सीमकार्ड देणेसाठी संस्थानची सध्या सुरु असलेले १०० सीमकार्डची मर्यादा वाढवून २०० करावी लागेल.

सदरचा प्रस्ताव मा.त्रीसदस्यीय समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी. मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९** **१२ व्होल्ट डी.सी. बॅट-या खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाबाची वीज घेऊन तिचे कमी दाबात रुपांतर करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये सबस्टेशनची उभारणी केलेली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी सबस्टेशनमध्ये जनरेटरसेट बसविलेले आहे. यामध्ये साईनगर (श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता) येथील १०१० केव्हीए, साईआश्रम-०१ येथील (ए.सी.युनिटकरीता) ३२० केव्हीए क्षमतेचे दोन, शांतीनिवास येथील १५ केव्हीए, ज्युनिअर कॉलेजचे १५ केव्हीए, रथपालखी लाईट व्यवस्थेकरीता १५ केव्हीए जनरेटर हे जनरेटर चालू करण्यासाठी कमिन्स कंपनीच्या मेन्टेनन्सकरीता बॅट-या वापरण्यात आलेल्या आहे. तसेच प्रत्येक जनरेटरच्या क्षमतेप्रमाणे बॅट-यांची क्षमता असावी लागते.

तसेच या बॅट-याची कार्यक्षमता २४ महिन्याची असते. त्यानंतर त्यांची कार्यक्षमता कमी होऊन जनरेटर चालू होण्यास अडथळे निर्माण होऊन जनरेटर काही वेळेस चालू होत नाही. त्यामुळे महत्त्वाचे ठिकाणी अंधारात राहू शकता. यासर्व ठिकाणच्या बॅट-या वापरुन त्यांचा कालावधी दोन वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे नवीन बॅट-या खरेदी कराव्या लागतील.

| अ. नं. | तपशील | ठिकाण | मागणी | दर (अंदाजे) | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | Cummins (Plus Ultra Light) Part No.AX 1012843, 12 V 65 Amp, Battary Model: PLT65-12A | पालखी जनरेटर, शांतीनिकेतन, ज्युनिअर कॉलेज, डिझेल टँकर मोटार करीता, साईआश्रम-१ ३२० केव्हीए जनरेटर, साठवण तलाव-२५० केव्हीए | १० नग | रु.१२,००० | रु.१,२०,०००/- |
| ०२) | Cummins (Plus Ultra Light) Part No.AX 1012845, 12 V 160 Amp, Battary Model:PLT160-12A | साईनगर १०१० केव्हीए | ०२ नग | रु.२९,०००/ | रु.०,५८,०००/- |
| | | | **एकुण रक्कम:-** | | **रु.१,७८,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे बॅट-या खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,७८,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १२ व्होल्ट डी.सी. बॅट-या खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,७८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० पिठाचे गिरणीचे जाते आऊटसोर्स पध्दतीने टाकणेकामी टेंडर बोलविणेबाबत तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात दररोज सरासरी 40 हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. तसेच दररोज सरासरी 10 हजार नाष्टा पाकिटे केली जातात. प्रसाद भोजन व नाष्टा पाकिटमध्ये भक्तांना चपाती व पुरी देणेकामी दररोज 55 क्विंटल आटा तयार करणेत येतो. याकरीता प्रसादालय विभागाकडे 18 इंच जाते साईजच्या दोन व 16 इंच जाते साईजची एक अशा एकुण 3 गिरणी कार्यरत आहेत. तसेच लाडू प्रसाद निर्मीती विभागामार्फत दररोज 1 लाख लाडू नग व बुंदीचे 65 हजार पाकीटे तयार केले जातात. याकामी दररोज सरासरी 35 क्विंटल बेसन तयार करण्यात येते. याकरीता 16 इंच जाते साईजच्या दोन व 18 इंच जाते साईजची एक अशा एकुण 3 गिरणी कार्यरत आहेत.

उपरोक्त सहा गिरणी सकाळी 7 ते रात्री 10 वाजेपर्यंत 15 तास अविरत चालू असतात. तसेच उत्सव काळात आटा व बेसन कमी पडू नये याकरीता रात्री सुद्धा गिरण्या कार्यान्वित ठेवाव्या लागतात. पिठाची गुणवत्ता व आऊटपूट मिळणेकरीता गिरणीचे जातेला दर 5-6 दिवसांनी टाके मारावे लागतात. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 8.1.2014 रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा नं. एसएसएस/वशि/प्रसादालय/4822/2014 दिनांक 18.1.2014 ने दिनांक 1.2.2014 ते दिनांक 31.1.2015 या कालावधी करीता श्री बाळासाहेब बाबुराव ढगे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यादेश दिलेपासून जाते टाके मारणेसाठी माहे फ्रेबुवारी 2014 ते सप्टेंबर 2014 या 8 महीने कालावधी करीता रक्कम रु 41,200/- एवढा खर्च आलेला असून प्रती महा सरासरी रक्कम रु.5,150/- खर्च होत आहे. तसेच सर्व सहा गिरणींना दर वर्षी नविन जाते टाकावे लागतात. याकरीता दगडाला होल मारणे, त्यात शिसे ओतने, शॉफ्ट फिट करणे यासारखी कामे करावे लागतात. (या कामाचा मागील कार्यादेशात समावेश नाही.)

श्री ढगे यांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक 31.1.2015 रोजी संपत आहे. गिरणीचे जातेला टाके मारणे व नविन जातेला टाकेमारुन फिटींग करणे यासारखी कामे पुढिल दोन वर्ष कालावधी करीता आऊटसोर्स पद्धतीने करणेसाठी वर्तमान प्रत्रात जाहीरात देऊन टेंडर बोलावून करावे लागणार आहे. याकामी अंदाजे रु. 2,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :- तरी श्री साईप्रसादालय विभागाकडे तसेच लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडे वापरात असलेल्या गिरणीचे जातेचे टाके टाकणे तसेच नविन जाते फिटींग करणे याकामी वृत्तपत्रात जाहीरात देऊन विहीत पद्धतीने टेंडर बोलविणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. 2,00,000/- मात्रच्या खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामधील पिठाचे गिरणीचे जाते आऊटसोर्स पध्दतीने टाकणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने टेंडर मागविणेस व याकामी येणा-या रु..२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११** **श्री साईप्रसादालयाच्या दैनंदिन इंधन खर्चामध्ये बचत होणेकरीता तसेच फुड वेस्ट डिस्पोजल समस्या दूर करणेकरिता बायोगॅस प्लॅन्टची उभारणी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांच्या सेवेसाठी सन 2011 पासून श्री साईप्रसादालय सुरु करण्यात आलेले आहेत. तेव्हापासून आक्टोबर 2014 पर्यत प्रसाद भोजनचा लाभ घेतलेल्या भक्तांची संख्या व भोजन तयार करणेसाठी इंधन म्हणून वापरलेल्या एल.पी. जी. खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे:

| कालावधी | एकूण भक्तांची संख्या | सरासरी प्रतिदिनी भक्तांची संख्या | एक वर्षात वापरलेला गॅस (किलोमध्ये) | प्रतिदिनी वापरलेले ा गॅस (किलोमध्ये) | सध्याचे दरानुसार प्रतिदिनी गॅसचा खर्च रुपय |
|---|---|---|---|---|---|
| सन 2011 | 1,18,62,104 | 32,499 | 4,93,677 | 1,353 | 82,628 |
| सन 2012 | 1,38,93,287 | 38,063 | 6,05,549 | 1,958 | 1,19,535 |
| सन 2013 | 1,31,19,111 | 35,943 | 8,25,063 | 1,712 | 1,19,840 |
| सन 2014 आक्टोबर 14 पर्यत | 1,10,19,087 | 36,247 | 9,33,648 | 1,755 | 1,22,850 |

दिवसें दिवस भक्तांची संख्या वाढत असून, त्यानुसार प्रसाद भोजन व्यवस्थेकरीता इंधनाचा खप वाढलेला आहे. तसेच वारंवार इंधन दरातही वाढ होत असल्यामुळे इंधन खर्चातही वाढ होत आहे. दैनंदिन सरासरी भक्तांचे संख्येनुसार प्रती माणसी अंदाजे 60 ग्रॅम फुड वेस्ट धरल्यास 34,000 x 60 ग्रॅम = 2,040 किलो ओले फुड वेस्ट निघत आहे. त्यात दररोज दोन्ही शिफटचा 300 किलो भाजीपाला वेस्ट उदा. फळवर्गीय भाजीपाला, भाजीचे देठ इ. एकत्र केल्यास 2,040 + 300 = 2,340 किलो फुड वेस्टेज निर्माण होते.

सर्व वेस्टेज अन्नांपैकी स्थानिक दुध उत्पादक शेतकरी त्यांचे जनावरांसाठी काही प्रमाणात वेस्टेज अन्न घेऊन जातात व शिल्लक कचरा डेपोमध्ये पाठविले जाते. सध्या कचरा डेपो जवळील निमगांव ग्रामस्थ ानी वेस्टेज अन्नांचा कचरा टाकणेस मनाई केलेमुळे श्री साईप्रसादालयाचे फुड

वेस्टेजची विल्हेवाट लावणस अडचण येत आहे. सध्या प्रसादलयाचे उत्तर बाजुस खड्डे तयार करुन त्यात वेस्टेज टाकण्यात येत आहे. फुड वेस्टेजची विल्हेवाट लवकर न लावलेस दुर्गंधी सुटुन, प्रसादालयाचे शेजारील पुर्वेकडील रस्त्याने प्रसाद भोजन घेवुन परतणाऱ्या साईभक्तांना दुर्गधींचा त्रास होत आहे.

श्री साईप्रसादालयाचा दैनंदिन वाढलेला इंधन खर्च कमी करणे व फुड वेस्टेज डिस्पोजल समस्या दूर करणेसाठी श्री साईप्रसादालयाचे उत्तर बाजूस एल.ओ.टी. सिलेंडर मेनीफोल्ड यंत्रणा शेड जवळील जागेत बॉयोगॅस प्लॅन्ट उभारणे शक्य होणार आहे.

सध्याच्या फुड वेस्ट प्रमाणानुसार प्रस्ताविक बायोगॅस प्रकल्पाचा तांत्रिक तपशिल खालीलप्रमाणे :

* लागणारी जागा = 2,000 चौ. फुट
* निर्माण होणारे फुड वेस्ट = 2,300 किलो
* पाणी = 1200 ते 1500 लिटर प्रतिदिन
* वीज = 15 ते 20 किलोवॅट, 3 फेज कनेक्शन
* मनुष्यबळ = 4 (2 प्रती शिफट )
* भांडवली गूंतवणूक = अंदाजे रुपये 40 लाख
* पे-बॅक कालावधी = 1 वर्ष 7 महिने

बायोगॅस प्रकल्पापासून होणारे फायदे खालीलप्रमाणे :

* गॅस निर्मिती = 100 किलो प्रति दिन
* इंधन खर्चात बचत = रु. 7,000/- (LP गॅसचा प्रचलित दर रु. 70 प्रती किलो )
* ऑरगॅनिक खत निर्मीती = 250 किलो.
* खतापासून मिळणारे उत्पन्न = रु. 750/- (रु.3/- प्रती किलो)
* शासकिय अनूदान = प्रकल्प खर्चाच्या 50 %

बायोगॅस प्रकल्प उभारणी केल्याने साईप्रसादालयात दैनंदिन इंधन खर्चात बचत होईल तसेच फुड वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर होईल. बायोगॅस प्रकल्प उभारणी करणेकामी अंदाजे रुपये 40 लाख खर्च अपेक्षित असून, सदर प्रकल्पाची उभारणी संस्थान विहीत पध्दतीने टेंडर बोलावून करता येईल अथवा देणगीदार साईभक्त यांचेकडून देणगी स्वरुपात प्रकल्पाची उभारणी करुन घेता येईल. तसेच बायोगॅस प्रकल्प उभारणीकामी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा) यांचे मार्गदर्शन घेता येईल.

तरी बायोगॅस प्रकल्प उभारण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 40 लाख मात्रचे खर्चास अथवा देणगीदार यांचेकडून देणगी स्वरुपात बायोगॅस

प्रकल्प उभारणी करणेस मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाच्या दैनंदिन इंधन खर्चामध्ये बचत होणेकरीता तसेच फुड वेस्ट डिस्पोजल समस्या दूर करणेकरिता बायोगॅस प्लॅन्टची उभारणी करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू प्रकल्प देणगीदार साईभक्तांकडून देणगी स्वरुपात उभारणेत यावा अथवा देणगी स्वरुपात न मिळाल्यास प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१२** **रु.५ लाख व त्यापेक्षा कमी खर्च असलेल्या खरेदीच्या प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे खरेदी विभागामार्फत विविध विभागांसाठी आवश्यक किराणा माल, इलेक्ट्रीक- प्लंबिंग– हार्डवेअर- स्वच्छता साहित्य, फर्निचर, छपाई, कपडे, चादर, बेडशिट, बेंचेस इ. खरेदी करण्यात येते.

खरेदी विभागाकडील जा.क्र.१५२५/२०११ दि.०५.०७.२०११ रोजीचे परिपत्रकान्वये रक्कम रु.२५,०००/- मात्र पेक्षा कमी खर्च असलेली खरेदीचे कार्यवाही सबंधीत विभागामार्फत करणेबाबत कळविणेत आलेले आहे. सध्या खरेदी विभागामार्फत रक्कम रु.२५,००१/- व त्यापेक्षा जादा रक्कमेची खरेदी केली जाते. सदरचे खरेदीपैकी रक्कम रु.२५,००१/- ते रक्कम रु.४९,९९९/- मात्र पर्यंतचे खरेदीसाठी संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांचे पत्त्यावर दरपत्र मागणी फॉर्म पाठवून खरेदी केली जाते. रक्कम रु.५०,०००/- ते रु.९,९९,९९९/- मात्रचे खर्चाचे रक्कमेचे खरेदीसाठी विहित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदा प्रक्रिया राबविली जाते. तसेच रक्कम रु.१०,००,०००/- व त्यापेक्षा जादा खर्चाचे खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असते.

सदर खरेदीच्या प्रक्रिया राबवितांना रक्कम रु.५०,०००/- मात्र पेक्षा जादा खर्चाचे खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देणे, निविदा विक्री करणे, आलेल्या निविदा, नमुने स्विकारणे, निविदेतील तांत्रिक लिफाफे तपासणेबाबत कार्यवाही करणे, तांत्रिक लिफाफे तपासणीचे तक्ते तयार करणे, नमुने निवडणेबाबत कार्यवाही करणे, त्याचे तक्ते तयार करणे. मा.व्य.समितीचे सभेत व्यापारी लिफाफे (Financial Bid) उघडणे. मा.व्य.समितीचे निर्णयाप्रमाणे पुरवठा आदेश देणे, मंजुर पुरवठाधारकांशी करारनामे करणे इ. स्वरुपाचे कामे प्रत्येक निविदेसाठी केली जातात.

दि.१२.११.२०१४ रोजी मनुष्यबळ व्यवस्थापना संदर्भातील सभेचे वेळी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात झालेल्या चर्चेप्रमाणे खरेदी विभागामार्फत रक्कम रु.५,००,०००/- मात्र व त्यापेक्षा जादा खर्चाच्या खरेदीबाबत निविदा कार्यवाही करणे, तसेच त्या खालील खर्चाचे साहित्य हे सबंधीत विभागांनी विहित पध्दतीने खरेदी करावे, असे निर्देश दिले आहेत.

रक्कम रु.५,००,०००/- व त्यापेक्षा कमी खर्चाच्या साहित्याची खरेदी म्हणजे तातडीच्या स्वरुपाची असते त्यामुळे सबंधीत विभागांनी सदरची खरेदी केल्यास, विभागांना त्यांना हवे असलेले साहित्य किंबहुना वेळेच आत खरेदी करता येईल, त्यामुळे विभागांचे कामाची गैरसोय होणार नाही. सबब दि.१२.११.२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात झालेल्या चर्चेप्रमाणे यापुढे रक्कम रु.५,००,०००/- व त्यापेक्षा कमी खर्चाच्या साहित्य खरेदीबाबत सबंधीत विभागांनी कार्यवाही करणेबाबत व रक्कम रु.५,००,००१/- व त्यापेक्षा जादा खर्च असलेल्या साहित्याची खरेदी ही खरेदी विभागामार्फत करता येईल.

तरी प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरील विषय व्यवस्थापन मंडाळाचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रु.५ लाख व त्यापेक्षा कमी खर्च असलेल्या खरेदीबाबत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३** **पुर्वलेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्सीय समितीच्या दि.११ सप्टेंबर,२०१४ रोजीच्या सभेत आयत्या वेळचा विषय क्र.२ निर्णय क्र.७९४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

पुर्व लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्राप्त झालेल्या ४५ निविदा/दरपत्रके आजचे सभे समक्ष उघडणेत आले.यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत उघडणेत आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अंतीम निर्णयासाठी पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

पुर्व लेखापरिक्षक कामाकाजासाठी आलेल्या एकुण ४५ निविदा/ दरपत्रके प्राप्त झालेल्या आहेत. संस्थानला प्राप्त झालेल्या एकुण ४५ निविंदापैकी विहीत पात्रता धारण न करणा-या १० लेखापरिक्षण संस्थाना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. उर्वरीत ३५ निविंदांपैकी कमीत कमी मानधनाची मागणी व अनुभवाची पात्रता पुर्ण करणा-या एकुण ०५ लेखापरिक्षण संस्थांची अंतिम यादी तयार

करण्यात आलेली आहे. त्यांचा सविस्तर तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ प्रमाणे.

उपरोक्त पात्र लेखापरिक्षण संस्थापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.बी.डी.खैरनार अॅन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नासिक यांची वार्षिक रुपये १,२०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख वीस हजार मात्र) संस्थान + हॉस्पटल विभागासाठी असुन, त्यांना सदर कामाचे आदेश देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच या व्यतीरीक्त जेव्हा केव्हा संस्थानला अतिरीक्त लेखापरिकांची गरज भासेल किंवा उपरोक्त न्युनतम दरधारक सेवा देण्यास असमर्थ ठरेल तेव्हा, तातडीची गरज म्हणुन न्युनतम दरापासुन चढत्या क्रमाने देकार असणा-या आणखी पाच लेखपरिक्षण संस्थांचे पॅनल तयार करुन ठेऊन, त्याच दरात आवश्यकतेनुसार त्यांची सेवा घेण्यात येईल.

<u>**विभागाचा अभिप्रायः-**</u> संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच त्या अनुशंगाने आर्थिक व्यवहारातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखेकडून व श्रीसाईबाबा हॉस्पिटल वित्त विभागाकडून आदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणेपुर्वी पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परिक्षण झाल्यास नजर चुकीने होणा-या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे शक्य होतील. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पुर्व लेखापरिक्षक स्वतः हजर राहणार असल्यामुळे, वैधानिक लेखापरिक्षणातही त्यांची मदत होवुन वैधानिकलेखा परिक्षकांच्या आक्षेपांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल. सबब सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार लेखापरिक्षकाचा कामाचा अनुभव, मानधन याबाबी विचारात घेता खालील प्रमाणे नमुद ५ लेखापरिक्षकांपैकी मे.बी.डी.खैरनार अॅन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, नासिक यांची संस्थानसाठी व रुग्णालय विभागासाठी पुर्व लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक होणेकामी, तसेच त्यांना त्याप्रमाणे नेमणुक आदेश देणेकामी निर्णयार्थ मा. त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१०००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावित केलेप्रमाणे लेखापरिक्षण संस्थांच्या अर्जांमधून अनुभव व मानधन या बाबींचा सर्वांगीण विचार करुन त्यामधील पाच लेखापरिक्षण संस्थांचे पॅनल तयार करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१४ संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगीक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथे संस्थानच्या दैनंदिन कामकाज चालविणेसाठी व अधिनियमातील तरतुदी नुसार उद्देश पार पाडण्याकरीता धान्य, किराणा माल, बांधकाम साहित्य, विद्युत कामे, वैद्यकीय साधने, औषधे, स्वच्छता सेवा घेणेसाठी ठेकेदारी पद्धतीने पुरवठादार नेमले जातात.त्या करीता निदी पद्धत अवलंबलेली आहे.

सदयास्थितीत संस्थान राबवित असलेल्या निविदा पद्धतीमध्ये अनेक उणिवा आढळुन आलेल्या आहेत. उदा.निविदा टपालाद्वारे स्विकारणे, ई निविदेचे वेळापत्रकामधील निविदा स्विकृतीची तारीख व प्रत्यक्ष निविदेतील चेक, डी.डी.च्या प्रती, कागदपत्राच्या प्रती स्विकारणेच्या तारखा सारखेच असणे परिणामी निविदा धारकांची नावे इतर निविदा धारक अथवा निविदा काढणारी संस्था यांना निविदा स्विकृतीच्या अंतीम दिनांकाच्या आधिच समजल्याने तक्रारीस वाव राहतो.नमुना निवडी पद्धतीमध्येही उणिवा आढळलेल्या आहेत.सध्या असलेल्या प्रचलित पद्धतीमध्येही निविदेवेळीच पुरवठाधारकाकडुन नमुने मागविले जातात.त्यापैकी नमुना पसंत असलेल्या पुरवठादाराचे नमुने निवडले जातात. त्यामुळे इतर पुरवठादारांवर अन्यायाची भावना निर्माण होते.या नमुना निवड पद्धतीला कोणत्याही शासकीय नियमांचा आधार नसल्याने शासनाच्या नियमानुसार धोरण अवलंबण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. उपरोक्त कार्यप्रणालीत सुधारण्याकरण्यासाठी वित्त व लेखाविभागामार्फत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचना,परिपत्रके व आदेश तसेच महाराष्ट्र शासनाचे निर्णय,सुचना नियमावली यांचे आधारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान हे महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या अधिनियम 2004 नुसार कार्यरत असल्याने महाराष्ट्र शासन निर्णय व केंद्रीय दक्षता आयोगाचे निर्णय,परिपत्रक,मार्गदर्शक सुचना संस्थानवर बंधन कारक आहे.

1)**निविदा वेळापत्रक:-** निविदासंबधाचे निविदा प्रक्रीया अधिक पारदर्शक व्हावी कोणत्याही निविदा धारकांवर निविदा भरताना दबाव राहु नये, निविदा भरण्यापासुन वंचित राहु नये.तसेच निविदाधारकांने आपपसात एकत्र येऊन ठरवुन निविदा सादर करु नये.यास्तव ई निविदा पद्धत शासनाने अंमलात आणलेली आहे.वरील उद्देश साध्य व्हावा यासाठी ई निविदाचे वेळापत्रक असे असावे की,कोणत्याही निवीदा धारकास ई निविदा प्रक्रीया सुरु असताना इतर निविदाधारकाची नावे कळु नयेत. तसेच ज्या संस्थेने ई निविदा मागविल्या आहेत.त्या संस्थेलाही ई निवदा प्रक्रीया सुरु असताना निविदा धारकाची नावे कळु नये.जेणे करुन निविदा धारक आपपसात ठरवुन निविदा भरणार नाहीत. अथवा त्यांचे निवीदा भरताना दबाव असणार नाही.तेव्हा केद्रीय दक्षता आयोग यांचे परिपत्रक क्र.स/No 009/VGL/002 केंद्रीय सतर्कता आयोग

भारत सरकार दिनांक 26 एप्रिल 2010 नुसार असे प्रस्तावित करण्यात येत आहे की, हि निवीदा प्रक्रीया सुरु असताना कोणताही हाड कॅापीज कार्यालयात बोलावुन देऊ नये. Uploading, Downloading बंद झाल्यानंतर म्हणजे ई निविदा स्विकृतीच्या अंतीम दिनांका नंतरच तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रे मागवावीत. (Scaned Copies ची पडताळणी करण्यासाठी) सदरील प्रस्तावास मान्यता मिळावी.

2)**नमुना निवड पद्धतीबाबत:-** सद्यस्थितीत संस्थैान आवश्यक मलाचे निविदेमध्ये तपशिलवार स्पेसिफीकेशन न देता निविदा प्रक्रीया सुरु असताना निविदा धारकाकडुन नमुने मागनिते व आलेल्या नमुन्यामधुन समितीद्वारे पसंद असलेल्या नमुन्यांची निवड करते.

सदरील पद्धतीस शासकीय नियमांचा आधार नाही.त्यामुळे तक्रारदारास तक्रारीस वाव राहतो.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या परिपत्रक No-2EE-1 CTE-3 Govt of india दिनांक 15/10/2003 मध्ये स्पष्ट केलेले आहे की, नमुना निवडपद्धत अवलंबवु नये त्या एैवजी निविदेमध्येच मलाचे तपशिलवार स्पेसीफिकेशन द्यावे.व तदनंतर गरज भासल्यास यशस्वी निविदाधारकाकडुन माल पुरवठ्याच्यावेळी नमुने मागवुन निविदेमध्ये नमुना केलेल्या स्पेशीफिकेशनशी पडताळुन घेऊनच मालाचे आदेश द्यावेत.

वरील बाबींचा विचार करुन असे प्रस्तावित करण्यात येत आहे की, निवीदेच्यावेळी निविदाधारकांकडुन नमुना मागविण्याची पद्धत बंद करुन केंद्रीय दक्षता आयोगाच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही होऊन निविदेमध्येच मालाचे तपशिलवार स्पेसीफिकेशन व वर्णन द्यावे त्यांनतर यशस्वी निविदाधारकांकडुनच माल स्विकारताना स्पेसीफिकेशनशी पडताळणी करावी व त्या प्रमाणे असल्यास मालाचे आदेश द्यावेत.

3)**संगणक प्रणाली खरेदी करणेबाबत:-** संगणक प्रणाली खरेदी करण्यासाठी रु.50,000/- च्यावर खरेदी असल्यास जाहिर निविदा मागवितात. जाहिर निविदा मागविताना विशिष्ट कंपन्यांचे Brand निविदेमध्ये नमुद करण्यात येतात. सबब इतर कंपन्या खुल्या निविदेमध्ये भाग घेण्यापासुन वंचीत राहतात.

भारत सरकारच्या वित्त मंत्रालायाकडुन दि.17 डिसेंबर 1998 रोजी सदरील बाब स्पष्ट करण्यासाठी परिपत्रक निर्गमीत केले आहे की, DGS & D यांनी संगणाकाचे स्पेशीफिकेशन निश्चित केलेले आहेत. तेव्हा दर करार निश्चिच नसल्यास खुल्या निविदा प्रक्रीयेत कोणत्याही प्रकारच्या कंपनीचा ब्रॅंड देऊ नये. शासनाचा दर करार असल्यास दर करारानुसार सदरील प्रणाली व इतर खरेदी करावी. उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी.

4) **निविदा लिफाफे निविदाधारकांसमोर उघडणे:-** संस्थान मार्फत मागविणेत आलेल्या निविदा प्रचलीत पद्धतीनुसार निविदा धारकासमोर न उघडता समितीसमोर उघडल्या जातात. तसेच निविदा सिलबंद पेटीत न मागवता टपालद्वारे स्विकारल्या जातात.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या परिपत्रक क्र.05.04-1-CTE-8 दिनांक 08/06/2014 नुसार निविदापेटीमध्ये टाकुनच पेटी सिलबंद केली पाहिजे.व निविदेमध्ये नमुद केलेल्या तारखेस निविदा धारकांसमोर निविदा उघडली गेली पाहिजे.सदरील परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.तसेच असेही प्रस्तावित करण्यात येत आहे की वरील अ.क्र.01 ते 04 मधील निर्णयात बदल करावयाचा असेल तर त्यास शासनाची किंवा उच्च न्यायालयाची परवानगी अवश्यक राहील.व शासनाकडे होणारे बदल संस्थानला आपोआप लागु होतील.

सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१००१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगीक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१५ श्री साईसच्चरित (हिंदी) ग्रंथाचे प्रकाशनाचे अधिकार संस्थानला देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील नं.१७ (२)(ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

“श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील 

या तरतुदीनुसार संस्थानमार्फत साईभक्तांना साईबाबांचे जीवनावर प्रकाशने उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

श्री दिलीप मारुती पवार, साई केशर प्रकाशन, पुणे यांनी दि.०४.११.२०१४ रोजीचे पत्रान्वये संस्थान प्रकाशीत कै.गोविंद रघुनाथ दाभोळकर विरचीत श्री साई सच्चरित मराठी ( पोथी ) या ग्रंथाचा हिंदी अनुवाद तयार केला आहे. सदर ग्रंथाचा हिंदी अनुवाद करतांना त्यांनी प्रत्येक ओवीचा अर्थ,भाव न बदलता ओवीच्या मर्यादेत राहून, प्रत्येक ओवीच्या अर्थाचा विपरीत अर्थ होऊ नये याची खबरदारी घेतली आहे.सदर ग्रंथ संस्थानने प्रकाशीत करुन हिंदी भाषिक भक्तांसाठी उपलब्ध करुन दिल्यास ग्रंथाचा उपयोग पारायण करणेसाठी होऊ शकेल तसेच सुरुवातीस स्वखर्चाने ५०० प्रती छापून संस्थानला देणगी स्वरुपात

देण्याचा त्यांचा मानस आहे. सदर ग्रंथाचे अधिकार ते संस्थानला विनामूल्य देणार आहेत.

संस्थानमार्फत श्री साई सतचरित- हिंदी गद्यात्मक स्वरुपात (स्टोरी पध्दतीने ) प्रकाशीत करण्यात आले आहे. परंतु पद्यात्मक स्वरुपात श्री साई सच्चरित – मराठी (पोथी) चा हिंदी भाषेत अनुवाद प्रकाशीत झालेला नाही. सदर ग्रंथ संस्थानमार्फत प्रकाशीत केल्यास हिंदी भाषिक भक्तांना मराठी पोथी प्रमाणे हिंदी पोथीचा उपयोग पारायण करणेसाठी होऊ शकेल तसेच “श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार होणेस मदत होईल.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूवी,केलेला अनुवाद मुळ पुस्तकाबरहुकूम असलेबाबत व अनुवाद करतांना त्याचे अर्थात कोणताही बदल केला नसल्याबाबत पुणे विघापीठाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.त्यानुसार त्यांनी पुणे विघापीठाचे प्रमाणपत्र दि.१८.११.२०१४ रोजी सादर केले आहे.

सबब श्री दिलीप मारुती पवार, पुणे यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता पुर्ण केली असल्याने त्यांचेकडून देणगी स्वरुपात ५०० प्रती स्वीकारुन श्री साई सच्चरित मराठी पोथीचा हिंदी भाषेत केलेला अनुवाद संस्थानव्दारा प्रकाशन करणेस सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.१००२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री दिलीप मारुती पवार, पुणे यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता पुर्ण केली असल्याने त्यांचेकडून देणगी स्वरुपात ५०० प्रती स्वीकारुन श्री साई सच्चरित मराठी पोथीचा हिंदी भाषेत केलेला अनुवाद संस्थानव्दारा प्रकाशन करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१६ शैक्षणिक संकुलाचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय व इंग्लिश मिडीयम स्कुल तसेच कन्या विद्या मंदिराकडे रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या भरती प्रक्रिया पूर्ण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१३ अन्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक व मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१२ अन्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१६ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विद्यालयाकडील शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक पदाची भरती प्रक्रिया पूर्ण करणेस जनसंपर्क कार्यालयामार्फत पुढारी व पुण्यनगरी या वृत्तपत्रात

दि.२८/०८/२०१४ वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. जाहिरातीनुसार प्राप्त उमेदवारांचे अर्ज व तक्ते आरक्षण कक्षामार्फत तपासणी करून घेण्यात आले आहे.

**१) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्याल,शिर्डी**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी ३३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील पात्र व अपात्र उमेदवारांचा तपशील खालीलप्रमाणे..

| अ.नं. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग | अर्ज संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पात्र | अपात्र | एकूण |
| ०१ | पूर्ण वेळ सहाय्यक शिक्षक (परिवीक्षाधीन) रसायनशास्त्र १ पद | एम.एस्सी. (द्वितीय श्रेणी) बी.एड. | SC/ST | ०२ | ०६ | ०८ |
| ०२ | पूर्ण वेळ सहाय्यक शिक्षक भौतिकशास्त्र पद संख्या-१ | एम.एस्सी. (द्वितीय श्रेणी) बी.एड. | SC/ST | ०१ | ०३ | ०४ |
| ०३ | अर्धवेळ सहाय्यक शिक्षक पर्यावरणशास्त्र १- पद | एम.एस्सी. (द्वितीय श्रेणी) बी.एड. | unreserved | ०१ | ०० | ०१ |
| ०४ | प्रयोगशाळा सहाय्यक १- पद | बी.एस्सी. (प्राणीशास्त्र/ वनस्पतीशास्त्र) जीवशास्त्र | SC/ST | ०७ | ०३ | १० |
| ०५ | प्रयोगशाळा सहाय्यक १- पद | बी.एस्सी. (संगणकशास्त्र) माहिती तंत्रज्ञान | SC/ST | ०१ | ०१ | ०२ |
| ०६ | इतर पदासाठी आलेले अर्ज - | | | ०० | ०८ | ०८ |
| | | | | | एकूण आलेले अर्ज- | ३३ |

**२) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर,शिर्डी**

| अ.नं. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग | अर्ज संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पात्र | अपात्र | एकूण |
| ०१ | सहाय्यक | एच.एस.सी. | ST-1 OPEN- | ST-२ OPEN- | ४५ | ४९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शिक्षक (परिवीक्षाधीन) (प्राथमिक) | (सायन्स)+ डी.एड./डी.टी.एड .+ टी.ई.टी.उत्तीर्ण | 1 | २<br>०४ | | |
| ०२ | सहाय्यक शिक्षक (परिवीक्षाधीन) (माध्यमिक) | संस्कृत पदवीधर+ बी.एड. (टी.ई.टी.उत्तीर्ण असल्यास प्राधान्य) | OPEN-1 | ०२ | १० | १२ |
| ०३ | इतर पदासाठी आलेले अर्ज - | | | ०० | ५७ | ५७ |
| एकूण आलेले अर्ज- | | | | | | ११८ |

**३) श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूल,शिर्डी**

| अ.नं. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग | अर्ज संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पात्र | अपात्र | एकूण |
| ०१ | सहाय्यक शिक्षक (परिवीक्षाधीन) (प्राथमिक) | एच.एस.सी. (सायन्स)+ डी.एड./ डी.टी.एड.+ टी.ई.टी.उत्तीर्ण (इंग्रजी माध्यमातील उमेदवारांना प्राधान्य) | SC-1<br>OBC-2<br>OPEN-2 | SC-३<br>OBC-०<br>OPEN-२<br>०५ | ८५ | ९० |
| ०२ | सहाय्यक शिक्षक (परिवीक्षाधीन) (माध्यमिक) | बी.ए.(इंग्रजी)+ बी.एड. (टी.ई.टी.उत्तीर्ण व इंग्रजी माध्यमातील उमेदवारांना प्राधान्य) | SC-1 | ०८ | २१ | २९ |
| ०३ | इतर पदासाठी आलेले अर्ज - | | | | | |
| | | | | | एकूण आलेले अर्ज- | ११९ |

उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक संकुलाचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय व इंग्लिश मिडीयम स्कूल तसेच कन्या विद्या मंदिरकडे रिक्त असलेल्या शिक्षक व

प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक भरती प्रक्रिया पूर्ण करणे कामी पात्र उमेदवारांचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.१३/०३/२०१४ चे निकाल पत्रामध्ये सुचविल्याप्रमाणे न्यायालयाचे अॅड-होक समिती मार्फत्उमेदवारांची अर्ज पडताळणी करता येईल. अॅड-होक समितीचे मार्गदर्शनाखाली पुढील भरती प्रक्रिया राबविता येईल. याकामी औरंगाबाद येथे जाउन अॅड-होक समितीने सुचविलेनुसार कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००३ यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय व इंग्लिश मिडीयम स्कुल तसेच कन्या विद्या मंदिराकडे रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या भरती प्रक्रिया पूर्ण करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल/ प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर )

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७ शैक्षणिक संकुलाकडील कार्यरत सहाय्यक शिक्षक व ग्रंथपालांना विहीत वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव- (अ) श्री शेखर गुलाब पवार व श्रीमती वैजयंता निवृत्ती गजरे, सहाय्यक शिक्षक/ शिक्षिकां यांना प्राथमिक विभागाकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक– दि. 12/06/2012 रोजीची सभा निर्णय क्र.435**

**प्रास्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/03/2011रोजीचे सभेत निर्णय क्रमांक 235 नुसार अधिन राहून व दि.17/08/2011 रोजीचे मंजूर टिपणीने श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागाकडे खालीलप्रमाणे 2 शिक्षणसेवक(प्राथमिक) म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

| अ. नं | उमेदवारांचे नांव | पदनाम | जात-प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री पवार शेखर गुलाब | सहा. शिक्षक | हिंदु-महार | बी. एस्सी. | जा.नं.एसएसएस/इ. मि.स्कुल/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (परिविक्षा धीन) | एस. सी. | डी. एड. | 3320/2011/दि.29/ 09/2011<br>हजर तारीख 1 आक्टो.2011 |
| 2 | श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती | सहा. शिक्षक (परिविक्षा धीन) | हिंदु- चांभार एस. सी. | एच. एस. सी. डी.टी.एड . | जा.नं.एसएसएस/इ. मि.स्कुल/ 3321/2011/दि.29/ 09/2011<br>हजर तारीख11 नोव्हें 2011 |

उपरोक्त नेमणूक आदेशान्वये उपरोक्त 2 उमेदवारांची शैक्षणिक वर्ष 2011-12 करीता दि. 30/04/2012 पर्यंत तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती. श्री पवार शेखर गुलाब व श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती या दोन शिक्षणसेवक (प्राथमिक) सेवा खंडीत होवू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.12/06/2012 रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. निर्णय क्रमांक 435 नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसएसएन1099/ (340/99) माशि-2 दि.13 ऑक्टोबर 2000 नुसार श्री पवार शेखर गुलाब व श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती या दोन सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) काम समाधानकारक असून वाढत्या वर्गसंख्या त्यांची आवश्यकता असल्याने त्यांना कामावर हजर झालेच्या तारखेपासून पुढे सलग 3 वर्षासाठी नवीन पदनामानुसार सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयाचे अधिन राहून जा. नं.एसएसएस/ वशी- इं.मि. स्कुल / 2456 दि.03/09/2012 चा नेमणूक आदेशानुसार श्री पवार शेखर गुलाब, कामावर हजर झालेची तारीख दि. 01 ऑक्टोबर 2011 व जा. नं. एसएसएस/ इं.मि.स्कुल/ 3321/2011/दि.29/09/2011च्या नेमणूक आदेशानुसार श्रीमती वैजयंता निवृत्ती गजरे, कामावर हजर तारीख 11 नोव्हेंबर 2011 पासून सलग तीन वर्षाच्या कालावधीसाठी सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) यांची नेमणुक करण्यात आली होती.

**मागणी-** शाळा संहिता नियमानुसार श्री पवार शेखर गुलाब एकत्रित मानधन रु.6000/- व श्रीमती वैजयंता निवृत्ती गजरे यांचा एकत्रित मानधन रु.6000/- सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधिन) यांचा अनुक्रमे दि. 30 सप्टेंबर 2014 व दि. 10 नोव्हेंबर 2014 अखेर परिविक्षाधिनी कार्यकाल संपुष्ठात येत असल्याने सदरचे शिक्षकांना नियमानुसार वेतनश्रेणी देवून संस्थान सेवेत कायम करावे असे नम्र मत आहे. त्यांचा सर्वसाधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | कर्मचारी नांव व हुद्दा | शिक्षण | प्रत्यक्ष | परिविक्षाधिन | वैद्यकीय |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कामावर हजर झालेची तारीख | कालावधी संपुष्ठात येत असल्याची तारीख | अधिक्षक यांचे वैद्यकीय दृष्टयांपात्र पात्र असलेबाबत प्रमाणपत्र |
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| ०१ | श्री पवार शेखर गुलाब (सहा. शिक्षक ) | बी. एस्सी. डी. एड. | 01/10/2011 | 30/09/2014 | दि.19/10/2011 प्रमाणपत्रानुसार पात्र |
| ०२ | श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती (सहा. शिक्षक) | एच. एच. सी. डी.टी.एड. | 11/11/2011 | 10/11/2014 | दि.14/11/2011 प्रमाणपत्रानुसार पात्र |

**दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन ऑफ रेग्युलेशन अॅक्ट, 1977 व रुल्स 1981 मधील कलम नं. 5 मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

**CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL.**

**2)** Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub section on (3) & (4) he shall, on completion of this probation period of two years, be deemed to have been confirmed.

**3)** If in the opinion of the management, the work or behavior of any probationer during the period of his probation, is not satisfactory, the management may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice)

उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार तसेच प्राचार्या, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी यांचा अभिप्राय विचारात घेता अ.नं. 1 व 2 वरील सहा. शिक्षक/ शिक्षिकां यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या (कॉलम नं. 05) तारखेपासून सुधारित वेतनश्रेणी रु.5200-20200 अधिक ग्रेड वेतन रु. 2800 नुसार देऊन संस्थान सेवेत कायम करावे असे नम्र मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** उपरोक्त अ.नं. 1 व 2 सहा. शिक्षक काम व वर्तणूक चांगली असून ते प्रामाणिक आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून ते हुकूमा प्रमाणेव योग्य रीतीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत.

**विभाग-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी**

**ब)** विषय- शैक्षणिक संकुलाकडील श्री सुनिल शेजवळ व श्री भाउसाहेब शिंदे ग्रंथपालांना विहीत वेतनश्रेणीत ग्रंथपाल पदावरकायम करणे विषयीच्या एकत्रित प्रस्तावाबाबत...

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – दि. 12/06/2014 रोजीची सभा निर्णय क्र. 517**

**प्रास्ताविक**– उपरोक्त विषयान्वये माध्यमिक शाळा संहितेनुसार पदवीधर ग्रंथपालांची अर्हता असलेली जाहीरात देवून अर्ज मागवून जाहीरातीने प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून उमेदवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. दि. 20/08/2010 रोजी निवड समितीद्वारे मुलाखती घेवून खालील उमेदवारांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| कर्मचा-यांचे नांव व हुद्दा | नियुक्ती आदेश क्रं | विभाग | शैक्षिणक अर्हता | नेमणूक दिनांक | परिविक्षाधिन कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 01) श्री सुनिल उत्तमराव शेजवळ -ग्रंथपाल | जा.क्र.एसएसएस/कविमं/ ५४८५/२०१२, दि.१ फेब्रुवारी २०१२ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | बी.ए.एम.लिब. आय.एस्सी | दि. 01/02/2012 | दि.३१ जानेवारी २०१५ ०३ वर्षे |
| 02) श्री भाउसाहेब बाबुराव शिंदे -ग्रंथपाल | जा.क्र.एसएसएस/कनिष्ठ/ ५४७९/२०१२, दि.१ फेब्रुवारी २०१२ | श्री साईबाबा कनिष्ठ महविद्यालय | बी.एस्सी.एम.लिब. आय.एस्सी. | दि. 01/02/2012 | दि.३१ जानेवारी २०१५ ०३ वर्षे |

उपरोक्त पदाची नेमणूक करतांना दि. 25 नोव्हेंबर 2005 या आकृती बंधाच्या शासन निर्णयानुसार सुरूवातीचे तीन वर्ष दरमहा रू. 2500/- एकत्रितमानधन देण्यात येईल व त्यानंतर वेतनश्रेणी दिली जाईल असे नमूद केलेले होते. या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे दि. 01/02/2012 पासून दोनही ग्रंथपालांची नेमणूक केलेली आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.14/01/2012 रोजीचे सभेत निर्णय क्र. 169 नुसार व दि. 23/04/2012 चे मंजूर टिपणीनुसार ग्रंथपालांचे मानधन रु. 2500/- मध्ये वाढ करण्यात येऊन रक्कम रुपये 5000 /- दरमहा दि.01/02/2012 पासून फरकासह देण्यात आलेले आहे.

दि. 23 आक्टोबर 2013 अन्वये सुधारीत शासन निर्णयानुसार दि. 25 नोव्हेंबर 2005 या शासन निर्णयाची अंमलबजावणी शासन स्तरावर झालेली नाही या नियमांचा वापर करून केलेल्या ग्रंथपाल पदांची वेतनश्रेणी व कालावधी रद्द (निष्प्रभावीत) करण्यात आलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत व येथून पुढे लागू राहणार नाही.

त्या ऐवजी दि. 23 आक्टोबर 2013 अन्वये खाजगी विना अनुदानीत शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांची , ग्रंथपालांची नेमणूक करतांना माध्यमिक

शाळा संहितेनुसार करावयाची आहे.त्यानुसार ग्रंथपाल पदाकरीता दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी व सदर पदाचे वेतन नेमणूक दिनांकापासून दिले जाते.

तसेच पदवीधर पात्रता असणा-या बी. लीब सायन्स ग्रंथपालास शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग पान नं.368 व दि २४ जानेवारी २०१४ नुसार सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणीनुसार दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी व विहीत पदाची वेतनवेतनश्रेणी 9300- 34800 अधिक ग्रेड पे 4300 त्यांना नेमणूक दिनांका पासून देय होत आहे.

**मागणीः-** मंजुर टिपणी व उपरोक्त उल्लेखीत शासन निर्णयांचा विचार करता पदवीधर ग्रंथपालांना पुढीलप्रमाणे आदेश देता येतील, असे मत आहे.

१) नेमणूक आदेशान्वये तीन वर्षाचा कालावधी दि. 31 जानेवारी 2015 अखेर पूर्ण होत आहे. दि. 01 फेब्रुवारी 2015 पासून ग्रंथपाल पदाची वेतन श्रेणी 9300 -34800 ग्रेड पे 4300 अशी पूर्वलक्षी प्रभावाने देता येईल.

अथवा

२) शासन निर्णय क्रमांक एसएसएन/ 1702/ 09/ 2002 माशि 2 दिनांक 03 ऑगस्ट 2006 व माध्यमिक शाळा संहितेनुसार (शिक्षकेतर कर्मचारी) यांना दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी दि.३१ जानेवारी २०१४ अखेर पूर्ण झालेला आहे. त्यांना दि. 01/02/2014 पासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4300 त्यांना नेमणूक दिनांकापासून देता येईल.

अथवा

३) शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१०००/(८७/२०००) माशी-02 डिसेंबर 2006 शालेय शिक्षण क्रीडा विभाग पान नं. 368 व माननीय सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचा निर्णय क्रमांक 9732/2012 ,दि. 24 जानेवारी 2014 अन्वये दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी व पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4300 त्यांना नेमणूक दिनांकापासून देता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** उपरोक्त अ.नं. 1 व 2 ग्रंथपाल यांची वर्तणूक चांगली असून ते प्रामाणिक आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रीतीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. तरी त्यांना वरीलप्रमाणे दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेडपे 4300 नेमणूक दिनांकापासून देऊन संस्थान सेवेत कायम करणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१००४ यावर सविस्तर चर्चा होऊन, (अ) प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल यांचे अभिप्राय विचारात घेता, श्री.शेखर गुलाब पवार व श्रीमती वैजयंता निवृत्ती गजरे, सहाय्यक शिक्षक/ शिक्षिकां यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेला असल्याने त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेला परिविक्षाधीन कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेपासून सुधारित वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड**

**वेतन रु.२८००/- मात्र देण्यात येऊन, सहाय्यक शिक्षक/ शिक्षिकां या पदावर संस्थान सेवेत कायम करणेत यावे.**

**तसेच (ब) संबंधीत विभागांचा अभिप्राय विचारात घेता श्री साईबाबा कन्या विद्या मंदिराकडील श्री.सुनिल उत्तमराव शेज्वळ व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील श्री.भाउसाहेब बाबुराव शिंदे यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेला असल्याने त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेला, परिविक्षाधीन कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेपासून सुधारित वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३००/- मात्र देण्यात येऊन, ग्रंथपाल या पदावर संस्थान सेवेत कायम करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल/ प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर )

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८ श्री.राजेंद्र सोपान सदाफळ यांना वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –</u> १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**<u>प्रास्ताविक –</u>** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**<u>मागणी –</u>**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **संस्थानचे मान्य यादीत असलेले व रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| 1 | राजेंद्र सोपान सदाफळ | स्वत: | ब्लड कॅन्सर | डॉ. मेहरोत्रा | दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | २९९९८९.०० | २९१५८९.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु.** | २९९९८९.०० | २९१५८९.०० |

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** सदर बिलांची संस्थान

वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम २९१५८९/- इतकी आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. व्यवस्थापन समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.१००५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कायम कर्मचारी श्री.राजेंद्र सोपान सदाफळ यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेली देय असलेली रक्कम अदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील औषधे दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम 2004 मधील तरतुद :-</u>** 17-2 (ण)

**<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-</u>**

1) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.24/05/2008 निर्णय क्र. 416(21)

2) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.07/07/2008 निर्णय क्र. 581

3) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.10/01/2010 निर्णय क्र. 192(6)

4) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.05/12/2010 निर्णय क्र. 958

**<u>प्रस्ताविक:-</u>** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे श्री साईनाथ व श्री साईबाबा असे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येते. सदरचे दोन्ही रुग्णालयात शिर्डी व शिर्डी परिसरातील तसेच श्रीं च्या दर्शनासाठी येणारे भक्त रुग्णालयात असणाऱ्या सुविधांचा फायदा घेत असतात. श्री साईबाबा रुग्णालयात विविध प्रकारच्या अद्यावत सुविधा रुग्णांचे सोईसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

त्यामध्ये प्रामुख्याने सि.टी.स्कॅन, एम.आर.आय., डायलेसिस, ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, ह्दय शस्त्रक्रिया, एन्डोस्कोपी, इत्यादी सुविधा उपलब्ध आहे. श्री साईबाबा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना जी औषधे संस्थानच्या औषध भांडारात उपलब्ध असतील ती वापरण्यात येतात तर जी औषधे संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध नसतील ती रुग्णांना बाहेरुन विकत आणावी लागतात. परंतु बाहेरील खाजगी दुकानदार हे रुग्णांना वाजवी पेक्षा जास्त दर आकारण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बाहेरील खाजगी दुकान हे 24 तास चालू नसतात त्यामुळे रात्रीच्या वेळेस उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णास औषधे लागल्यास ती मिळू शकत नाही.

याकरिता संस्थानचे व्यवस्थापन समितीने दि.07/07/2008 चे सभेतील निर्णय क्र. 581 अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे आवारात 24 तास औषध दुकान 5 वर्षाकरिता भाडे तत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

कारण महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन यांचे नियमानुसार औषध दुकान चालविण्याचा परवाना मिळविणेकामी कमीत कमी 5 वर्षाचा कालावधी आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.10/01/2010 रोजीचे सभेत अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस चेन्नई यांनी सदरचे औषध दुकान चालविण्यास दिलेले आहे. तसेच दुकान चालवणेकामी येणारा खर्च वजा जाता सर्व नफा संस्थानला देणगी म्हणून देऊ असा प्रस्ताव अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांनी दिला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र. 192 अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांनी आजचे सभेत साईबाबा रुग्णालयात रिटेल मेडिकल स्टोअर चालविणेकामी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावात त्यांनी रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेन्टेनन्स खर्च इत्यादी वजा जाता राहिलेला नफा संस्थानला देणगी म्हणून देण्यात येईल अशी विनंती केलेली होती. यावर चर्चा होऊन, याकामी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेंन्टेनन्स चार्ज देण्यात येऊन दुकान चालविण्यास देण्यात यावे तसेच याबाबत वैद्यकीय संचालक यांनी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांचेशी विहीत पध्दतीने याबाबत करारनामा करुन घेण्यात यावा, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांना इकडील पत्र क्र. 4890 दि.18/03/2010 अन्वये कार्याआदेश देऊन सदर कामी आदेशात सदरचे दुकान चालवणेकामी अट क्र.13 अन्वये खालील बाबीवरील खर्च वजा जाता होणाऱ्या नफयाची रक्कम संस्थानला जमा करणेबाबत ठरलेले होते.

| **Sr. No.** | **Details of operating charges** |
|---|---|
| 1. | Salary & Wages |
| 2. | Staff Welfare- Non-Statutory |
| 3. | Computer Stationery |
| 4. | Packing Material |
| 5. | Insurance |
| 6 | Outsource Charges |
| 7. | Audit Fee |
| 8. | Postage & Stamp |
| 9. | Miscellaneous Expenses |
| 10. | Freight Outward |
| 11. | Conveyance |
| 12. | Telephone & Net Connection |
| 13. | Electricity Charges |
| 14. | Repairs & Maintenance (M) |

| | |
|---|---|
| 15. | Office Maintenance (M) |
| 16. | Interest on Inventory |

सदर अटीमध्ये जर दरमहा नफा खर्च वजा जाता रु.2,75,000/- पेक्षा कमी झाला तर त्यांना कमीत कमी र.2,75,000/- देणे बंधनकारक राहिल असे ठरले होते. त्यानुसार दुकान कार्यान्वित झाल्यापासून रु.2,75,000/- पेक्षा जास्त नफा झालेला आहे व तो त्यांनी संस्थानमध्ये वेळोवेळी जमा केलेला आहे.

सदर दुकान चालवणेकामी लागणारा परवाना मिळणेबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार कमीत कमी 5 वर्षाचा भाडे करार आवश्यक असतो. त्यानुसार त्यांना 5 वर्षा करिता भाडे तत्वावर औषध दुकान चालवण्यास देण्यात आलेले आहे. करार नाम्यानुसार त्यांनी दुकान दि.01/04/2010 पासून कार्यान्वीत करणेबाबत ठरलेले होते. परंतु प्रत्यक्षात दि.09/05/2010 पासून सदर दुकान कार्यान्वित झालेले आहे.

संस्थानकडून इकडील पत्र क्र. 12866 दि. 01/09/2008 अन्वये शासनाकडे 5 वर्षाकरिता भाडे तत्वावर औषध दुकान चालवण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर दि.27/01/2010 रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सदर औषध दुकान भाडे तत्वावर चालवण्यास मान्यता मिळालेली होती तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सांसंवि 2009/196/प्र.क्र.10/का.16/दि.13/11/2013 चे पत्रान्वये मान्यतेबाबत खालील प्रमाणे आदेश प्राप्त झालेला आहे.

त्याबाबत आपणांस असे कळविण्याचे मला निर्देश आहेत की, श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर देण्यात आलेल्या औषध दुकानाचा करार संपुष्टात आल्यानंतर पुन्हा करारास मुदतवाढ न देता संस्थानमार्फत औषध दुकान चालविण्याच्या पर्यायाचा विचार करण्यात यावा किंवा संस्थानमार्फत औषध दुकान चालविणे शक्य नसल्यास दुकान भाडेतत्वावर चालविण्यास देताना जाहीर निविदा प्रक्रिया राबवून जास्तीत जास्त दराने दुकान भाडेतत्वावर देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात चालविण्यात येत असलेल्या नियम व अटीनुसार श्री साईनाथ रुग्णालयात देखील सदर दुकानाचे विस्तारीत कक्ष (Extension counter) मा व्यवस्थापन समिती सभा दि.05/12/2010 निर्णय क्र.958 अन्वये चालविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील पत्र क्र.5686 दि.23/12/2010 अन्वये दि.01/01/2011 पासुन पुढील 5 वर्षाकरिता दुकान चालविण्यास देण्यात आलेले होते, परंतु प्रत्यक्षात दि.01/12/2011 पासून कार्यान्वित झालेले आहे. सदर दुकानाचा कालावधी देखील करारनाम्यानुसार दि.31/12/2015 अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे दोन्ही ही रुग्णालयातील दुकानांसाठी सारखीच प्रक्रिया करावी लागणार असल्यामुळे एकाच वेळेस मान्यता व निविदा इत्यादी कार्यवाही करणे योग्य होईल.

यापुर्वी संस्थानतर्फे सदरचे औषध दुकान 3 महिन्याचे कालावधीसाठी चालवुन नंतर ते बंद करण्यात आले होते, कारण औषध दुकानातुन जी औषधे विक्री केली जातील त्याचे छापील बीले रुग्णांना देणे बंधनकारक आहे, व त्यावर संस्थानचा Sales Tax No. टाकणे अनिवार्य आहे. परंतु संस्थान ही धर्मादाय संस्था असल्यामुळे संस्थानचे नावाने Sales Tax No. घेतला तर संस्थानमार्फत जेथे जेथे साहित्य विक्री करण्यात येते त्या सर्वावर संस्थानला विक्रीकर भरावा लागेल. त्यामुळे सदरचे दुकान बंद करण्यात आले होते. त्यामुळे संस्थान तर्फे औषध दुकान तांत्रीक दृष्टया चालविता येणार नाही. तेंव्हा दोन्ही रुग्णालयाकरिता पुन्हा विहीत पध्दतीने ई-निविदा मागवाव्या लागतील. तसेच सदरच्या प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची देखील मान्यता घ्यावी लागेल.

**<u>मागणी:- संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-</u>** तरी दोन्ही रुग्णालयाकरिता औषध दुकान चालविणेस देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस, तसेच सदरच्या प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानंतर विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२० श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Nephroscope Set with Accessories खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद–</u>** १७-२ (ण)

**<u>प्रास्ताविक–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि. १८/०१/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये Nephroscope set with Accessories ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एक Nephroscope असुन तो सन २००९ मध्ये खरेदी केलेला आहे. सध्या General Operation Theater ला 12°, 20/8 FR चा Nephroscope आवश्यक असुन सदरचा

Nephroscope हा Adult व Paediatric पेशंटच्या ऑपरेशनसाठी वापरला जातो. म्हणून त्यांनी सदर Nephroscope set with Accessories ची मागणी केलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| SR. NO. | ITEM DESCRIPTION | QTY. | APP. RATE PER IN RS. | TOTAL AMT. IN RS. |
|---|---|---|---|---|
| 01. | Nephroscope with offset eyepiece, 12 DEG. 14FR. Channel automatic valve with sealing membrane and sealing cap, blue. | 01 | 2,95,000.00 | 2,95,000.00 |
| 02. | Telescopic Dilator Set 9-27 FR. | 01 | 47,585.00 | 47,585.00 |
| 03. | Telescopic Dilator Set 30 FR | 01 | 5,900.00 | 5,900.00 |
| 04. | PCNL Guide Rod 6 FR | 02 | 5,990.00 | 11,800.00 |
| 05. | Stone holding forceps with Alligator Jaws "Indian Make" | 04 | 1,750.00 | 7,000.00 |
| 06. | Stone Grasping Forceps Peanut Shaped "Indian Make" | 02 | 1,750.00 | 3,500.00 |
| 07. | Stone Grasping Forceps Peanut Shaped "Indian Make" | 02 | 1,750.00 | 3,500.00 |
| 08. | Nipple for Nephroscope color code RED. | 01 PKT. | 3,900.00 | 3,900.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **378185.00** |

वरीलप्रमाणे खरेदीकामी रु. ३,७८,१८५/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे दि. १८/०१/२०१४ रोजीचे मागणी पत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २३/०६/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-</u>** सध्या त्यांचेकडे एक Nephroscope असुन तो सन २००९ मध्ये खरेदी केलेला आहे. सध्या General Operation Theater ला 12°, 20/8 FR चा Nephroscope आवश्यक असुन सदरचा Nephroscope हा Adult व Paediatric पेशंटच्या ऑपरेशनसाठी वापरला जातो. म्हणून त्यांनी सदर Nephroscope set with Accessories ची मागणी केलेली आहे, त्यामुळे खरेदी करणेस हरकत नाही.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरिता 12°, 20/8 FR Nephroscope set with Accessories विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ३,७८,१८५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता 12°, 20/8 FR Nephroscope set with**

**Accessories विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३,७८,१८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२१ श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरकरीता Light Source LED खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद–</u>** १७ (२) ण

**<u>प्रास्ताविक–</u>** श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि. १३/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Light Source LED ची मागणी केलेली आहे. Light Source LED सध्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागात उपलब्ध नाही. सदर Endoscopy द्वारे रुग्णांची तपासणी करताना रुग्णांच्या शरीरातील विविध भाग व्यवस्थित पाहण्यासाठी सदर Light source उपयुक्त आहे.

सदर Light Source LED चे खरेदीकामी M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचे कोटेशन नुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी दर मागविण्यात आले होते, त्यानुसार रु. ४,३०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी-</u>** श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २१/०१/२०१४)

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** Light Source LED सध्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागात उपलब्ध नाही. सदर Endoscopy द्वारे रुग्णांची तपासणी करताना रुग्णांच्या शरीरातील विविध भाग व्यवस्थित पाहण्यासाठी सदर Light source उपयुक्त आहे.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Light Source LED विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ४,३०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरकरीता ०१ नग Light Source LED विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता**

**देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२२ श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता नवीन Syring Pump खरेदी करुन जुने Infusion Pump Buyback करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद–</u>** १७ (२) ण

**<u>प्रास्ताविक–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाने दि. २८/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ११ नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pump हे अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी उपयोग होतो. सध्या TSR विभागात 3 Syringe Pump असुन ते त्यांना कमी पडत आहेत, कारण तेथे दररोज सरासरी ३६ रुग्ण दाखल असतात व रुग्णांच्या संख्येच्या तुलनेत Syring Pump ची संख्या कमी पडते त्यामुळे त्यांनी नवीन ११ नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे.

सदर Syringe Pump खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु. ५१,०००/- याप्रमाणे ११ नग Syringe Pump खरेदीकामी अंदाजे एकूण रक्कम रु. ५,६१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच सन २००६ साली नवीन हॉस्पिटलचे मशिनरी/ उपकरणे खरेदी करतेवेळी M/s. Allwin Lifecare, Mumbai यांचेकडून १० नग Infusion Pump खरेदी करण्यात आलेले होते. सदर १० नग Infusion Pump औषध भांडार विभागात सन २००६ पासुन वापरात नाहीत, त्यामुळे १० नग Infusion Pump औषध भांडार विभागात शिल्लक आहेत, त्यापैकी सध्या ०९ पंप Buyback करता येतील.

त्यामुळे सदर Infustion Pump परत करुन (बायबॅक) वरील Syring Pump खरेदी करता येईल. सदर Infusion Pump बाबत सरकारी लेखापरिक्षण करतेवेळी त्यांना देखील Infusion Pump चा वापर होणार नसेल तर बायबॅक करावे अशा सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार सदर Infusion Pump बायबॅक करता येतील. सदर ०९ नग Infusion Pump ची घसारा वजा जाता येणारी किंमत रु. ४६,४९१/- इतकी होते.

**<u>मागणी–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाचे दि. २८/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०४/०९/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त

कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागात सध्या 3 Syringe Pump आहेत, तेथे दररोज सरासरी दाखल असलेल्या रुग्णांची संख्या ३६ असते तर Syring Pump ची संख्या तीनच आहे त्यामुळे तेथील Syringe Pump कमी पडत आहे, त्यामुळे त्यांना अजुन ११ नग Syringe Pump खरेदी करण्यास तसेच जुने ०९ Infusion Pump buyback करणेस हरकत नाही.

तरी TSR विभागाकरिता ११ नग Syringe Pump विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ५,६१,०००/- चे खर्चास तसेच जुने Infusion Pump buyback करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता ११ नग नवीन Syring Pump विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५,६१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच या विभागातील ०९ नग Infusion Pump बायबॅक करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३ श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता Fuji कंपनीच्या C.R.System Cassettes with Screen खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** <u>अधिनियम २००४ मधील तरतुद–</u> १७ (२) ण

<u>प्रास्ताविक–</u> श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाने दि. १६/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये Fuji कंपनीच्या 10"x12", 14"x17" व 8"x10" प्रत्येकी २ नग C.R. System Cassettes with screen ची मागणी केलेली आहे. सदर मशिन सन २०१३ या वर्षी देणगी म्हणून प्राप्त झालेले होते व कंपनीने त्याचे सोबत Cassettes with screen ह्या मोफत दिलेल्या होत्या, परंतु दैनंदिन वापराचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्या वापरुन खराब झालेल्या आहेत.

सदर विभागात दर वर्षी साधारणतः २५,००० फोटो काढले जातात, त्यामुळे कॅसेट लवकर खराब होतात. श्री साईनाथ रुग्णालयात Fuji कंपनीचे मशिन असुन त्यासाठी त्याच कंपनीच्या कॅसेट स्क्रिनसह लागतात. त्यामुळे त्यांनी नवीन Cassettes ची मागणी केलेली आहे. सदरहू Cassettes खरेदीकामी Fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. | Particular | Rate Per in | Total Amt. |
|---|---|---|---|

| | | Rs. | in Rs. |
|---|---|---|---|
| 01. | 14x17 Cassettes with screen | 1,01,250.00 | 2,02,500.00 |
| 02. | 10x12 Cassettes with screen | 95,625.00 | 1,91,250.00 |
| 03. | 8x10 Cassettes with screen | 90,000.00 | 1,80,000.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | **5,73,750.00** |

उपरोक्त साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ५,७३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईनाथ रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागाचे दि. १६/०८/२०१४ रोजीचे पत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २५/०८/२०१४).

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सध्या क्ष-किरण विभागाकडे असलेल्या Cassettes ह्या CR System सोबत कंपनीने दिलेल्या होत्या. दैनंदिन वापरामुळे त्या वापरुन खराब झालेल्या आहेत, तेंव्हा त्यांनी नवीन Cassettes with screen ची मागणी केलेली आहे, त्यामुळे खरेदी करणेस हरकत नाही.

तरी सदरहू CR System Cassettes with screen विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ५,७३,७५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता Fuji कंपनीच्या C.R.System Cassettes with Screen विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु.५,७३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुरेक्षेच्या दृष्टीने सन २००८ मध्ये मे. सेफ हाऊस सिक्युरीटी यांचेकडून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले होते. सदर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवुन आता जवळ-जवळ पाच वर्षे उलटुन गेली आहेत.

सदर सी.सी.टी.व्ही. कॅमे-यांचा वॉरंटी कालावधी तीन वर्षांकरिता होता. तद्नंतर १.६ वर्षाच्या कालावधीमध्ये मेन्टेनन्स करणेत आला होता.

परंतु सध्या स्थितीमध्ये सदर कॅमे-यासाठी आवश्यक असणारे साहीत्य उपलब्ध न झाल्यामुळे कॅमेरे बंद झालेले आहेत. तसेचत्याकरिता असलेली केबलींग सिस्टीम व संगणक चोवीस तास (राऊड ओ क्लॉक) कार्यान्वीत असल्याने पुर्णपणे नादुरुस्त झालेली आहे. दि. ३०.०६.२०१४ रोजीच्या टिपणी अन्वये याबाबत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे  बंद पडण्याचे तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत नेमून दिलेल्या सी.सी.टी.व्ही. कन्सल्टंट यांचे मार्फत दोन्ही रुग्णालयाची समक्ष पाहणी करुन त्यासंबंधी प्राजेक्ट रिपोर्ट तसेच टेंडर रिपोर्ट सादर करणेबाबत दि. ०५.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

दि. १९.०९.२०१४ रोजी मे. कन्सल्टंट ऑप्टीमेस्टिक समृध्दी, अहमदनगर यांनी सदरबाबत टेंडर रिपोर्ट इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. सदर रिपोर्टमध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता अंदाजे रक्कम रु. ३८,७२,५००/- (अक्षरी रुपये अडोतीस लाख बहात्तर हजार पाचशे) व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता रक्कम रु. ३०,४७,५००/- (अक्षरी रुपये तीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे) मात्र इतका खर्च येणार असले बाबत नमुद केले आहे. तसेच सदर कंन्सल्टंटने तीन वर्षाच्या कालावधीसाठी दर महा सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवुन कार्यान्वीत करणेकरिता श्री साईबाबा हॉस्पिटल करिता रु. १.५ लाख व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता रु. १ लाख इन्स्टॉलमेन्ट स्वरुपात खर्च देणेबाबत सुचविले आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे अंत्यत गरजेचे असल्याने ते कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरिता उपरोक्त संस्थानने नेमुन दिलेल्या कंसल्टंट यांचे संदर्भीय पत्रानुसार...

**अ)** श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता अंदाजे रक्कम रु.३८,७२,५००/- (अक्षरी रु. अडोतीस लाख बहात्तर हजारपाचशे) व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रक्कम रु.३०,४७,५००/- (अक्षरी रु.तीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे) असा एकुण रु.६९,२०,०००/- (अक्षरी रु. एकोण सत्तर लाख वीस हजार) मात्र इतका खर्च येणार असल्याने सदर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी ई-निविदा प्रसिध्द करणेस .

<u>किंवा</u>

**ब)** तीन वर्षाच्या कालावधीसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवुन कार्यान्वीत करणेकरिता श्री साईबाबा हॉस्पिटल करिता दर महा रक्कम रु. १.५ लाख व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता रक्कम रु. १ लाख इन्स्टॉलमेन्ट स्वरुपात देणेकामी ई-निविदा प्रसिध्द करणेस.

तरी उपरोक्त “अ” किंवा ”ब” प्रस्तावाबाबत मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ब प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये तीन वर्षाच्या कालावधीसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे इन्स्टॉलमेन्ट स्वरुपात बसवुन कार्यान्वीत करणेकरिता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस तसेच याकामी श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता रु.१.५ लाख मात्र व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता दरमहा रु.१ लाख मात्र दरमहा येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२५ श्री साईबाबा रुगणालयातील जनरल ओ.टी. विभागात युरोलॉजी शस्त्रक्रियेकरीता किरकोळ सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद–</u>** १७ (२) ण

**<u>प्रास्ताविक–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागामध्ये युरोलॉजीच्या शस्त्रक्रिया करणेसाठी खालील सर्जिकल साहित्यांची आवश्यकता आहे. कारण सदर साहित्यांची वार्षिक औषधे खरेदी (२०१३-२०१४) मध्ये त्यांनी मागणी केलेली नव्हती त्यामुळे दि. २३/११/२०१३ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २७/१२/२०१३) चे मागणीपत्रान्वये मागणी केलेली आहे.

सदर सर्जिकल साहित्य खरेदीकामी M/s. Vishal Surgical Equipment Co., Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी ई-मेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Vishal Surgical Equipment Co., Mumbai यांनी दि. ०३/०३/२०१४ चे ई-मेल पत्रान्वये खालील लागणा-या सर्जिकल साहित्यांचे दर दिलेले आहे.

| Sr. No. | Catalouge No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 01. | 279 | Monopolar High Frequency Cord with 4 mm plug for HF-unit, models KARL STORZ and Erbe T, older models; length 300 cm | 01 | 3,990.00 | 3,990.00 |
| 02. | 27055 C | Seal bonnet, perforation 1.2 mm | 12 | 367.50 | 4410.00 |
| 03. | 27040G | Cutting loop, angled, 24Fr., color code, Yellow this article is only available in units of 6 | 04 | 6,187.50 | 24,750.00 |
| 04. | 27040L | Coagulating Electrocode, pointed, 24Fr, color code: Yellow this article is only | 01 | 6,187.50 | 6,187.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | available in units of 6 | | | |
| 05. | 27040G | Cutting Loop, angled, 24Fr. Color code : Yellow this article is only available in units of 6 | 01 | 6,187.50 | 6,187.50 |
| | | **Total Amt. in Rs.** | | | **45,525.00** |

वरीलप्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रु.४५,५२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे दि.२३/११/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २७/१२/२०१३)

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सदरचे सर्जिकल साहित्य विहित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ४५,५२५/- चे खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.१०१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागात युरोलॉजी शस्त्रक्रियेकरीता आवश्यक असलेले प्रस्तावित किरकोळ सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.४५,५२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री साईनाथ रुग्णालयातील ई.सी.जी. विभागाकरीता ई.सी.जी. मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** १७ (२) ण

**प्रास्ताविक–** श्री साईनाथ रुग्णालयाचे ई.सी.जी विभागाने एक नग १२ Channel ई.सी.जी मशिनची मागणी केलेली आहे, कारण तेथे सध्या वापरत असलेले मशिन हे सन २००७ मध्ये खरेदी केलेले आहे, सध्या ते व्यवस्थित काम देत नाही.

रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे त्यांनी अजुन एक नवीन मशिनची मागणी केलेली आहे. सध्याचे मशीन जर ऐनवेळेस बंद पडले तर कामाची गैरसोय होईल याकरिता एक पर्यायी मशिन उपलब्ध असणे योग्य

राहील. दरवर्षी सरासरी सदर विभागात १८,००० ई.सी.जी. होतात. त्यामुळे पर्यायी मशिन खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईनाथ रुग्णालयातील ई.सी.जी. विभागाचे दि. १६/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/१०/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे त्यांनी अजुन एक नवीन मशिनची मागणी केलेली आहे. सध्याचे मशीन जर ऐनवेळेस बंद पडले तर कामाची गैरसोय होईल याकरिता एक पर्यायी मशिन उपलब्ध असणे योग्य राहील. त्यामुळे नवीन मशिन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग ई.सी.जी. मशिन विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्चाचे रक्कम रु. ९०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ई.सी.जी. विभागाकरीता ०१ नग ई.सी.जी. मशिन विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरीता यु.पी.एस. खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद –</u>** १७ (२) ण

**<u>प्रास्ताविक–</u>** श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाने दि.०१/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग यु.पी.एस. ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या वापरत असलेला यु.पी.एस. हा वापरुन खराब झालेला आहे त्यामुळे तो व्यवस्थित काम देत नाही.

याकामी मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२६,७७५/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01. | 2 KVA / 96VDC On Line UPS Internal Battery back up system 30 Min. Back up time | 01 | 26,775.00 | 26,775.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **26,775.00** |

**मागणी–** श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाचे दि. ०१/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २६/०९/२०१४).

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सोनोग्राफी मशिन हे महत्वाचे व महागडे आहे त्याचे सुरेक्षिततेसाठी सदर यु.पी.एस. खरेदी करणे गरजेचे आहे. तेव्हा एक नग यु.पी.एस. खरेदी करण्यात हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग यु.पी.एस विहित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. २६,७७५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरीता ०१ नग यु.पी.एस. विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२६,७७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाकरीता २- डी इको मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** १७ (२) ण

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाने 2 - डी इको मशीनची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे असलेले मशीन हे खराब झाल्यामुळे त्यांनी दि. २८/०३/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नगाची मागणी केलेली आहे. सदर मशिनची मागणी ही दि. २५/०७/२०१४ रोजी औषध भांडार विभागात प्राप्त झाली आहे. त्यांचेकडे असलेले 2 - डी इको मशिन हे सन २००६ मध्ये रु. ४०,००,०००/- इतक्या रक्कमेत with probe घेतले होते. सदर मशिनवर आतापर्यंत ५०,००० रुग्णांच्या तपासण्या झालेल्या आहेत. त्यानंतर सन २००९ मध्ये TEE probe हे रु. २० लाख इतक्या किंमतीस खरेदी करण्यात आले होते. त्यानंतर M/s. Philips India Limited, Mumbai यांनी त्यांचे

पत्रान्वये मशिनचे CMC व 2 - डी इको यांचे Spare Part उपलब्ध होऊ शकत नाही असे कळविले. सदर मशिनचा वापर हा पेशंटच्या ह्दयाचे ठोके व्यवस्थित आहे किंवा नाही याचे निदान करण्यासाठी होतो, त्यामुळे सदर मशिन खरेदी करणे गरजेचे आहे.

सदरचे 2 - डी इको मशिन खरेदीकामी M/s. Philips India Limited, Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Philips India Limited, Mumbai यांनी दि. १६/०६/२०१४ चे पत्रान्वये सदर 2 - डी इको चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| **Sr. No.** | **Description** | **Qty.** | **Rate per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|
| 01 | 2 D ECHO Machine with probe | 01 | 69,00,000.00 | 69,00,000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **69,00,000.00** |

**मागणी –** श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाचे दि. २८/०३/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्तिद. २५/०७/२०१४)

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दि. ३१/०३/२०१४ अखेर किंमत रु. ३,५०,३९५/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करता येईल. तसेच सदरच्या खरेदीकामी रु. १० लाखापेक्षा जास्त खर्च येणार असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाकडे असलेले 2- डी इको मशिन हे सन २००६ मध्ये रु. ४०,००,०००/- इतक्या रक्कमेत with probe घेतले होते. त्यानंतर सन २००९ मध्ये TEE probe हे रु. २० लाख इतक्या किंमतीस खरेदी करण्यात आले होते. M/s. Philips India Limited, Mumbai यांनी दि. ०८/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये मशिनचे CMC व Spare Part उपलब्ध होऊ शकत नाही, असे कळविले आहे, त्यामुळे नविन मशिन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाकरिता 2- D ECHO Machine with Probe एक नग विहित पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ६९,००,०००/- चे खर्चास तसेच सदर प्रस्तावास शासनाची पूर्वमान्यता घेणेस व मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. यास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या आदेशानंतर जुने 2- D ECHO Machine with Probe बायबॅक करणेकामी शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९ कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन संरचनेत सुधारणाकरणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या रुग्णालयांमध्ये तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ/ सी एम ओ व टेक्निशियन्स, स्टाफ नर्स या पदांची कर्मचारी संख्या अपूरी असल्याने रुग्णांना वैद्यकिय सुविधा पुरविणेत अडचणी येत आहे. सदर अडचणी सोडविणेकामी संबंधीत पदांवर तात्पुरते स्वरुपात 11 महिने कालावधीसाठी वैद्यकिय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात येतात. परंतु, त्यांना देण्यात येणारे वेतन त्याच पदावर तेच काम करणाऱ्या स्थायी कर्मचाऱ्यांचे वेतनापेक्षा फारक कमी असल्याने ते येण्यास इच्छुक नसतात. आलेच तर टिकुन राहत नाही. मध्येच सोडून जातात. कारण सारखेच काम करणाऱ्या स्थायी व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनात फारच तफावत आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सध्याचे एकत्रित वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार ठरविणेत आलेले आहे. स्थायी कर्मचाऱ्यांचे वेतनात सहाव्या आयोगानुसार सुधारणा करण्यात आली परंतु, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनात सुधारणा करण्यात आलेली नाही.

रुग्ण सेवेत अडचणी येऊ नये म्हणून सध्या उपरोक्त पदावर कार्यरत असलेल्या कायम कर्मचाऱ्यांस जे वेतन मिळते त्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने/ 11 महिने कालावधीसाठी नेमणूकीस असलेल्या उमेदवारांना वेतन देणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा, जेणेकरुन सदरचे पदांवर तातडीने उमेदवार उपलब्ध होतील व रुग्ण सेवेत अडथळे येणार नाहीत. असे मा. कार्यकारी अधिकारी सा ो., यांनी दि. 15/11/2014 रोजीचे आढावा बैठकीत निर्देश दिलेले आहेत.

तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ /सी एम ओ व टेक्निशियन्स, स्टाफ नर्स या पदांवरील कायम कर्मचाऱ्यांना वेतनबॅन्ड नुसार मिळणारे वेतन व फिक्स पे / मानधन यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| पदनाम | मंजूर वेतनबॅन्ड व ग्रेड पे | वेतनबॅन्ड नुसार मासिक मिळणारे किमान एकूण वेतन | कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सध्याचे एकत्रित वेतन | फरक रुपये |
|---|---|---|---|---|
| तज्ञ वैद्यकिय अधिकारी | 15600-39100 ग्रेड वेतन 6600 मध्ये मुळ वेतन रु.18750+6600 व इतर अनुज्ञेय भत्ते | 50,700/- | 35,000/- | 15,700/- |
| कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी | 15600-39100 ग्रेड वेतन 5400 व इतर अनुज्ञेय भत्ते | 42,000/- | 32,000/- | 10,000/- |
| आर एम ओ/ सीएमओ/ बीटीओ | 15600-39100 ग्रेड वेतन 5400 व इतर अनुज्ञेय भत्ते | 42,000/- | 27,000/- | 15,000/- |
| परफ्यूजनिस्ट | 9300-34800 ग्रेड वेतन 4400 व इतर अनुज्ञेय भत्ते | 27,400/- | 21,000/- | 6,400/- |
| स्टाफ नर्स | 9300-34800 ग्रेड वेतन 4200 व इतर अनुज्ञेय भत्ते | 27,000/- | 11,000/- | 16,000/- |
| एम आर आय टेक्निशियन | 9300-34800 ग्रेड वेतन 4200 व इतर अनुज्ञेय भत्ते | 27,000/- | 11,000/- | 16,000/- |
| डायलेसीस टेक्निशियन | 9300-34800 ग्रेड वेतन 4200 व इतर अनुज्ञेय भत्ते | 27,000/- | 11,000/- | 16,000/- |
| हिस्टोपॅथ टेक्निशियन | 9300-34800 ग्रेड वेतन 4200 व इतर अनुज्ञेय भत्ते | 27,000/- | 11,000/- | 16,000/- |
| फार्मासिस्ट | 5200-20200 ग्रेड | 16,000/- | किमान | 7445.50 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वेतन 2800 व इतर अनुज्ञेय भत्ते | | वेतन कायद्यानुसार (रु. 285.15 दररोज प्रमाणे रु. 8554.50 दरमहा | |
| ज्यू. सी.टी.स्कॅन टेक्नीशियन | 5200-20200 ग्रेड वेतन 2400 व इतर अनुज्ञेय भत्ते | 15,200/- | किमान वेतन कायद्यानुसार (रु. 285.15 दररोज प्रमाणे रु. 8554.50 दरमहा | 7405.50 |
| ज्यू. एक्स-रे टेक्नीशियन | 5200-20200 ग्रेड वेतन 2400 व इतर अनुज्ञेय भत्ते | 15,200/- | किमान वेतन कायद्यानुसार (रु. 285.15 दररोज प्रमाणे रु. 8554.50 दरमहा | 7405.50 |
| ज्यू. लॅब टेक्नीशियन | 5200-20200 ग्रेड वेतन 2000 व इतर अनुज्ञेय भत्ते | 14,400/- | किमान वेतन कायद्यानुसार (रु. 285.15 दररोज प्रमाणे रु. 8554.50 दरमहा | 7405.50 |

कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या व नव्याने नेमणूक करण्यात येणाऱ्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ, सी एम ओ/ बी.टी.ओ., टेक्निशियन्स व स्टाफ नर्स यांना त्याच पदावर काम करणाऱ्या स्थायी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे जवळपास मानधन / एकत्रित वेतन अदा केल्यास कर्मचारी मिळण्यास अडचण येणार नाही व मध्येच सेवा सोडून जाण्याचे प्रमाण कमी होईल, असे मत आहे.

तरी, उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ, सी एम ओ/ बी.टी.ओ., टेक्निशियन्स व स्टाफ नर्स यांना त्याच पदावर काम करणाऱ्या स्थायी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे जवळपासचे वेतन देणेस मान्यता देण्यात आली.**

**मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी करणेपूर्वी अशा संपूर्ण पदांचा आढावा व प्रत्यक्ष द्यावयाचे वेतन यासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येऊन, मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------

<u>यानंतर पुरवणी विषयांवर चर्चा करणेत आली.</u>

**पुरवणी**

**विषय नं.०१** **दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेकामी प्राप्त झालेले प्रस्ताव उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सन २०१७ -२०१८ मध्ये शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दिर्घकालीन गरजा विचारात घेऊन सर्व संबंधित विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करुन त्यानुसार कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र /राज्य शासन व संस्थान मार्फत आवश्यक निधी/ अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी विभाग निर्णय क्र.सासंवि-२०१३/प्र.क्र.१/का.१६, दि.२२/१०/२०१३ अन्वये सन्मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

यानुसार हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगिण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.९४३ अन्वये खालील प्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

*“श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त शिर्डी व लगतचे परिसराचा विकास आराखडा तयारकरणेकामी या क्षेत्रातील नामांकीत,अनुभवी व मोठया स्वरुपाची कामे केलेल्या ०५ सल्लागार संस्थाना निमंत्रित करणेत यावे असे ठरले. तसेच याकामी येणारे सर्व समावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.”*

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार या क्षेत्रातील नामांकीत, अनुभवी व मोठया स्वरुपाची कामे केलेल्या सल्लागारांची नांवे व पत्ते इंटरनेटच्या माध्यमातुन प्राप्त करण्यात आले, सदर २१ सल्लागार संस्थांकडून त्यांचे संस्थेबाबतची सविस्तर माहिती, पुर्वानुभव याबाबत संस्थानचे जा.क्र.५६४४/२०१४ दि.०८/०३/२०१४ रोजीचे पत्रान्वये दि.२०/०३/२०१४ अखेर माहिती सादर करणेस कळविणेत आले होते. त्यानुसार खालील सहा संस्थांकडून माहिती प्राप्त झाली.

**अ.नं. सल्लागार संस्थेचे नांव**

01 Tata Consulting Engineers Limited, Noida
02 Intercontinental Consultants & Technocrats Pvt. Ltd., New Delhi
03 Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai
04 STUP consultants Pvt.Ltd, Navi Mumbai
05 Ernst & Young LLP, Hyderabad
06 Knowarch, Mumbai.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त सल्लागार संस्थांबद्दलच्या तांत्रिक माहितीचे बंद लिफाफे मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि.१४/०४/२०१४ रोजी उघडणेत आले.

मा. त्रिसदस्य समितीचे दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७९ अन्वये उपरोक्त पैकी अ.नं.१ ते ५ चे सल्लागार यांनी मोठया स्वरुपाची कामे केलेली असून त्यांचा वार्षिक टर्नओव्हर मोठया स्वरुपाचा असल्याने त्यांचेकडून फी बाबतचे वाणिज्यिक प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.

त्यानुसार संस्थानचे जा.क्र.२३८८/२०१४ दि.१३/०८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सल्लागार यांचेकडून प्रस्ताव मागविणेत आले आहेत. सदरहु प्रस्तावाबाबत दि.०५/०९/२०१४ रोजी Pre –Bid मिटींग संस्थानचे शिर्डी येथील सभागृहात घेण्यात आली. त्यावेळी सल्लागार यांनी तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव देणेसाठी काही मुद्यांबाबत माहिती विचारली होती.

त्याबाबत सल्लागार यांना दयावयाची माहिती (Common Set of deviations) संस्थानचे जा.क्र.२९२६/२०१४ दि.१६/०९/२०१४ रोजीचे पत्राने पाचही सल्लागार संस्थांना देण्यात आली. तसेच सल्लागार यांचे अंतीम प्रस्ताव दि.२२/०९/२०१४ पर्यंत संस्थांनचे शिर्डी येथील कार्यालयात जमा करणेस कळविणेत आले होते.

यावर सल्लागार संस्था Intercontinental Consultants & Technocrats Pvt. Ltd., New Delhi यांनी त्यांचे दि.१९/०९/२०१४ रोजीचे पत्राने त्यांचे सध्या चालु असलेल्या इतर प्रकल्पामुंळे विषयांकीत प्रकल्पासाठी निविदा सादर करणेस असमर्थ असल्याचे कळविले आहे.

तसेच सल्लागार Ernst & Young LLP, Hyderabad यांनी त्याचे दि.१६/०९/२०१४ रोजीचे पत्रात दि.२२/०९/२०१४ पर्यंतचे कालावधीत त्यांचा

अंतीम प्रस्ताव सादर करणेस असमर्थता दर्शविली असून प्रस्ताव सादर करणेसाठी दि.२९/०९/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशी विनंती केली आहे. तसेच भारत सरकारने दि.३१/०८/२००६ रोजीच्या Manual of Policies and Procedure of Employment of Consultants यामध्ये सल्लागार संस्थांना त्यांचे प्रस्ताव सादर करणेसाठी किमान १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा असे निर्देश असल्याचे नमूद केले आहे. सदर Manual ची प्रत इंटरनेटवरुन डाऊनलोड केली असता त्यामध्ये वर नमूद केलेप्रमाणे मार्गदर्शक त-त्वाचा (कलम 3.5) उल्लेख आहे.

त्यानुसार सल्लागार संस्थांना त्यांचा अंतीम वित्तीय प्रस्ताव सादर करणेस किमान १५ दिवस म्हणजेच दि.२९/०९/२०१४ अखेर मुदतवाढ देणेस व याबाबत पाचही सल्लागार कंपन्यांना कळविणेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यावर दि.२३/०९/२०१४ पर्यंतचे एक दिवसांचे वाढीव मुदतीत सल्लागारांचे अंतीम वित्तीय प्रस्ताव स्वीकारणेस मान्यता देण्यात आली. याबाबत ०५ संस्थांना दि.२०/०९/२०१४ रोजी ई-मेल व्दारे कळविण्यात आले. सिलबंद प्रस्ताव सादर करण्याच्या सदरहु अंतीम मुदतीत खालील ०२ सल्लागार संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

| अ.न. | सल्लागाराचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | Tata Consulting Engineers Limited, Noida | ११६८१ दि.२२/०९/२०१४ |
| ०२. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | ११७८० दि.२२/०९/२०१४ |

वरील विषयांकीत प्रकल्प हा मह-त्वाचा व मोठ्या स्वरुपाचा असल्याने फक्त दोनच प्रस्ताव प्राप्त झाल्याने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे जा.क्र. ३१५६/२०१४ दि.३०/०९/२०१४ रोजीचे पत्रान्वये पाचही सल्लागार संस्थांनादि. १३/१०/२०१४ अखेर पर्यंत अंतीम प्रस्ताव सादर करणेस वाढीव मूदत देण्यात आली. त्यानुसार खालील तीन सल्लागारांचे प्रस्ताव संस्थानकडे जमा झालेले आहेत.

| अ.न. | सल्लागाराचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | Tata Consulting Engineers Limited, | ११६८१ / |

| | | | |
|---|---|---|---|
| | Noida | | दि.२२/०९/२०१४ |
| ०२. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | ०१३२८९ / दि.१३/१०/२०१४ | |
| ०३. | Ernst & Young LLP, Hyderabad | ०१३२६६ / दि.१३/१०/२०१४ | |

तरी वरील प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद पाकीटे मा. त्रिसदस्य समि तीचे सभेपुढे उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ०३ सल्लागारांकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक व वाणिज्यिक प्रस्तावांची सिलबंद पाकिटे आजचे सभेसमोर समक्ष उघडणेत आली. या उघडणेत आलेल्या प्रस्तावांचे मुल्यमापन करणेत येऊन, त्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**पुरवणी**

**विषय नं.०२ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षित लेख्यांसह शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०६/११/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापिरक्षण अहवाल नोंद घेऊन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेकामी सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा विचार विनिमय होऊन, लेखापरिक्षण अहवाल हा दिशादर्शक असतो व त्यामध्ये काही आक्षेप असतील, तर ते मा.व्य.समितीचे सभेसमोर आले पाहिजे म्हणजे त्या आक्षेपांची पुर्तता करणे शक्य आहे का हे पाहता येईल. याकरीता सविस्तर लेखा आक्षेपासह लेखापरिक्षण अहवाल सादर करण्यात यावा असे ठरले.

त्यास अनुसरुन वैधानिक लेखापरिक्षण लेखा आक्षेप विवरण सोबत सादर केले आहे. त्याचे अवलोकन होऊन सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणअहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षित लेख्यांसह शासनाकडे सादर करणेकामी अहवालाच्या साधारणत ७०० प्रति छपाई करण्यास

व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१०१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेण्यात येऊन सदरहू अहवाल लेखापरिक्षित लेख्यांसह शासनास सादर करणेस व या अहवालाच्या ७०० प्रतींची छपाई करणेकामी येणा-या अंदाजे रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.१०१९ मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** संस्थानमध्ये कुशल/ अकुशल कंत्राटी कामगारास मुदतवाढ देणेबाबत किंवा कामावर घेणेबाबतचा प्रस्ताव समितीसमोर सादर करताना, तो प्रस्ताव कर्मचा-याच्या नावाने सादर करु नये पदासाठी सादर करावा व निर्णयामध्ये समिती कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत घेण्यास मंजूरी देत आहे, कोणाच्या विशिष्ट नावाची शिफारस करत नाही, असा उल्लेख करणेत यावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ कामगार अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**(२)** मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.१२.०४.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८५ अन्वये कनकुरी येथील साठवण तलावामध्ये Geomembrane Fabrics करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.१०.६५ कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरलेले आहे.

येत्या उन्हाळयामध्ये गंभीर पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे व गोदावरी उजवा तट कालव्यातून पिण्याचे पाण्यासाठी किती आवर्तन मिळतील याबाबत निश्चिती झालेली नाही. त्यामुळे मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करणेस विलंब होऊ नये, लगेचच कामास सुरुवात करता यावी, याकरिता सदरहूकामी मा.खंडपीठाच्या मान्यतेस अधीन राहून वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात याव्या व मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतरच संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच सदर कामामध्ये रफ शहाबादी फरशीचे काम समाविष्ट असून त्यामुळे काम पुर्ण

होण्यास विलंब होणार असल्याने व ही बाब वगळल्यास खर्चातही बचत होणार आहे. याकरिता सदर बाब वगळून सुधारित एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार निविदांची मागणी करणेत यावी.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**(३)** सभेच्या शेवटी साई मंदिराच्या सुरक्षिततेसंदर्भात चर्चा करणेसाठी मा.श्री.लखमी गौतम, पोलिस अधिक्षक, अहमदनगर व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या मुद्यावर चर्चा करत असताना मा.श्री.लखमी गौतम, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी श्रींचे मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसाठी खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या सुचनांची अंमलबजावणी करण्याचे सुचविण्यात आले.

A) संस्थानचे कायम सुरक्षा रक्षक व पोलिस कर्मचारी यांचा ड्रेसचा खाकी रंग एकसारखाच असल्यामुळे भक्तांना पोलिस कोण व सुरक्षा रक्षक कोण हे समजत नाही त्यासाठी संस्थानच्या कायम सुरक्षा रक्षकांच्या ड्रेसचा कलरमध्ये तातडीने बदल करण्यात यावा. तसेच संस्थानच्या कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांना पोलिस कॉन्टेबलच्या पात्रतेचे निकष लावावेत. (वजन, ऊंची, छाती व शेक्षणिक पात्रता इ.)

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

B) बाबांच्या चावडी व द्वारकामाईजवळ थेट वाहने येतात ते बंद करणेसाठी पुर्वीप्रमाणे बॅरीकेटींग करावी. तसेच मंदिराचे महाद्वारावरील पोलिस कर्मचा-यांनी चेकींगकामी संस्थान सुरक्षा रक्षकांना मदत करावी.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

C) व्ही.आय.पी. व व्ही. व्ही.आय.पी. यांचे दर्शनाकरीता गेट नं.01 चा वापर बंद करुन मंदीर परिसराचे उत्तर बाजूकडील गेट नं.02 तातडीने चालू करणेत यावे. ,तसेच मंदिराचे महाद्वारांवर सुरक्षा मोर्चे तयार करण्यात येऊन, सदर महाद्वारांवर बायनॅकुलर (दुर्बीण) बसविणेत याव्यात व नाशिक येथील कुंभमेळयाच्या वेळी, भविष्यात होणा-या गर्दीच्या अनुशंगाने शिर्डी शहराच्या बाहेर नगर- मनमाड रोडवर दोन्ही साईडला तीन-तीन किलोमीटर अंतरावर भक्तांची वाहने पार्किंग करणेसाठी वाहनतळ बनविणेत यावे.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

D) अतिरेकी हल्ला झाल्यास किंवा काही घटना घडल्यास बाहेरुन सुरक्षा मागविण्यात येते. त्यांना मंदिर परिसराची माहिती होणेसाठी मंदीर परिसराचा मॅप तयार करुन इमर्जन्सी डोअर, जिने इत्यादी गोष्टी

त्यामध्ये ठळक दिसतील अशा पध्दतीने बोर्ड तयार करुन मंदीर परिसरामध्ये लावावेत. तसेच मंदीर परिसराची वॉक थ्रु सी.डी. तयार करणेत येऊन, ती पोलिस विभागाकडे जमा करावी. कुंभमेळयाचे वेळी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्याने सध्याची दर्शनरांग अपुरी पडणार आहे. त्यामुळे तात्पुरती वाढीव दर्शन रांगेची व्यवस्था करणेत यावी. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

E) सी.सी.टी.व्ही.कंट्रोल रुमचा डाटा सध्या 03 दिवस साठविला जातो. तो 15 दिवस साठवून ठेवणेकामी कार्यवाही करावी. मंदीराचे बाहेरील बाजूचा 200 मिटरपर्यंत क्षेत्र कव्हर होईल, स्पष्ट चेहरे दिसतील (capacity & clarity) अशा प्रध्दतीने कॅमेरे बसविणेत यावेत. संस्थानचे सर्व भक्तनिवास, प्रसादालय येथे साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात असते तसेच रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्याही मोठया प्रमाणात असते. करीता सर्व परिसरामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व निवासस्थानांच्या गेटमध्ये बॅगेज स्कॅनर बसविणेत यावे.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

F) वॉटर हायड्रंट यंत्रणेकरीता ज्या केबलमधून एम.एस.ई.बी.चा सप्लाय दिलेला आहे. त्याच केबलमधुन जनरेटर्सचा सप्लाय दिलेला आहे. हे दोन्ही सप्लाय स्वतंत्र करणेत यावे. तसेच मंदीरामध्ये व दर्शन रांगेमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असते. लाईट गेल्यानंतर जनरेटर सुरु होईपर्यंत काही मिनीट पुर्णत: अंधार होतो. त्यामुळे काही दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी इमर्जन्सी लाईट असणे आवश्यक आहे. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

G) पोलिस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस विभागामार्फत संस्थानने सर्व कायम/ कंत्राटी सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देणेकामी प्रस्ताव सादर करावा. तसेच बी.डी.डी.एस.पथकासाठी आवश्यक साधन सामुग्री देणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

H) साई मंदीर सुरक्षेकरीता देण्यात आलेल्या काही वॉकी-टॉकी बंद आहेत. त्या दुरुस्त करुन देणेबाबत कार्यवाही करावी व नेहमी पाकीटमारी करणारे पाकिटमार मंदीर परिसरात आल्यास ते सी.सी.टी.व्ही. यंत्रणेमध्ये डिटेक्ट होणे अपेक्षित असते, तसे होत नाही याबाबत सॉफ्टवेअर अपडेट करणेत यावे.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

l) नाशिक येथील कुंभमेळयाचे वेळी शिर्डी येथे प्रचंड प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. या मोठया प्रमाणात होणा-या गर्दीचे नियोजनासाठी आराखडा तयार करणेत यावा तसेच गर्दी नियंत्रणासाठी दोर, टॉर्च आदी साहित्य राखीव साठयामध्ये ठेवण्यात यावे. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.९८८ ते १०१९ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्री ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरित/-**xxx** स्वाक्षरित/-**xxx** स्वाक्षरित/-**xxx**
(राजेंद्र जाधव) (अनिल कवडे) (शशिकांत कुलकर्णी)
कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकारी, अहमदनगर मुख्य जिल्हा न्यायाधीश
सदस्य सदस्य अध्यक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी